
# मुसलमान

## (समज–गैरसमज आणि माहिती)

तमन्ना इनामदार



# मुसलमान

## (माहिती, समज, गैरसमज)

तमन्ना इनामदार



दादा पुरव रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट

**Musalman**
(Mahiti, Samaj, Gairsamaj)
**- Tamanna Inamdar**

प्रकाशक / मुद्रक :
**दादा पुरव रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट**
**अन्नपूर्णा परिवार**
सी विंग, शुभम् हाईटस्,
रुणवाल प्रोजेक्टस् शेजारी,
सर्व्हिस रोड, वारजे, पुणे ४११०५८.
फोन : ८८८८८६३४५८

सर्वहक्क :
**तमन्ना इनामदार**
४३३ रास्ता पेठ, निदा अपार्टमेंट,
पुणे ४११०११.
मोबा. : ९३७३३२३५८९

पहिली आवृत्ती : २१ जानेवारी २०२३

मुखपृष्ठ : रूच पाटील

मुद्रणस्थळ :
साई समर्थ प्रिंटर्स
दुकान क्र. ४, विठ्ठल हाईटस्, सिंहगड रोड,
आनंदनगर, हिंगणे खुर्द, पुणे ४११०५१.

मूल्य : **रुपये पन्नास फक्त**

# संवाद आणि आपलेपणाच्या हाकेसाठी !

मुस्लीम समाजाविषयीचे भ्रम हेच वास्तव का वास्तवाविषयी तयार केले गेलेले वा आवर्जून पसरवलेले भ्रम अनिच्छेच्या तलम वस्त्राखाली झाकले गेलेले आहेत. एखादी व्यक्ती ज्या कोणत्या धर्मात जन्मते, तो धर्म त्याला कायमचा म्हणजे अंतापर्यंत चिकटून राहतो. त्याची इच्छा असो वा नसो, धर्माचा चोंगा वागवत तो जगतो. परंतु प्रत्येक व्यक्तीला जन्माने आयते मिळालेल्या धर्माची इत्थंभूत माहिती असते, धर्माचे सूक्ष्म अंतरंगही त्याच्या ज्ञानात सामावलेले असते, असे अजिबात म्हणता येत नाही. तसेच दुसऱ्या कोणी व्यक्तीने माझ्या धर्माचा अभ्यासच केला नाही, सत्यार्थ समजूनच घेतला नाही किंवा त्याला समजणारच नाही किंवा कोणी समजूनच घेऊ नये, हा दावा सर्वार्थाने फुसका साबीत होईल. स्वत: व्यतिरिक्त इतर धर्माचा, इतरांच्या धर्मग्रंथांचा सखोल अभ्यास करून ज्ञानाची कक्षा वाढवणारे अनेक अभ्यासक आपल्याला आसपास दिसतील. फक्त फुकाच्या अहंमचा चष्मा काढून ठेवला पाहिजे.

सामाजिक कार्य करताना आलेले अनुभव, भावलेले विषय आणि महत्त्वाची वाटलेली माहिती समाजापर्यंत पोहचवण्याच्या इराद्याने लेखणी, कागद हाती घेतला आणि अनेक लेख प्रसंगपरत्वे वृत्तपत्र सदर, मासिके, पत्रिका, दिवाळी अंकात लिहिता लिहिता वेगवेगळ्या विषयांवर अकरा पुस्तके लिहून झाली. या पुस्तकांच्या लेखनासाठी संशोधन दौरे, भेटीगाठी, बैठका करताना तळागाळातल्या, गावखेड्यातल्या मुस्लिमांच्या अंतरंगात डोकावता आले. सामाजिक कार्य,

व्याख्यानांच्या निमित्ताने मुस्लिमेतर जनांशीही दाट संपर्क सतत येत होता. तेव्हा काही गोष्टींची तीव्रतेने जाणीव झाली. मुस्लीम समाज मुख्य प्रवाहापासून अलिप्त राहतो, मुसलमानात काहीतरी गूढ अगम्य असते, ते मुस्लिमेतरांना सहन करत नाहीत, इतर धर्मीयांना काफिर समजतात वगैरे.... आणि या संशयाच्या सुप्त अग्नीचा वणवा बनवण्यासाठी संधीसाधू राजकारणी, त्यांची पिलावळ, ट्रोलभुते, सोशलमिडीयावरची खऱ्याचे खोटे, खोट्याचे खरे करणारी भाट मंडळी तनमनधन लावून झटत आहेत, हे जाणवले.

दुसरीकडे खुद्द मुसलमानांनाही खरा धर्म, धर्माचा गाभा कळला आहे, असे म्हणण्याचे धाडस होत नाही. अल्लाह आणि पैगंबरांचा इस्लाम राहिला बाजूला, मुल्ला-मौलनांच्या लाभाचा आणि वकुबाचा इस्लाम मुसलमानांत पेरला गेला. दाढी राखलेला, टोपी-कुर्ता-पैजामा घातलेला इसमच खरा मुसलमान, नीतिमान, शालीन, खानदानी, नेक असे अलिखित संकेत समाजात दृढ झाले. यापेक्षा वेगळे वागणारे, प्रश्न विचारणारे,  विरोधात बोलणाऱ्यांना काफिर ठरवून समूहापासून वेगळे पाडण्याच्या प्रकाराने घाबरणारा मुस्लीम इसम मनात शंका-कुशंका, प्रश्न-शक-शुभा घेऊन मुकाट समूहात राहणे पसंद करू लागला. याचा सर्वात जास्त फटका मुस्लीम समाजाला बसला. मुस्लीम समाजातून लिहिणारे, बोलणारे, यंत्रणेला जाब विचारणारे एकतर सावध भूमिका घेतात किंवा खाजगीत चर्चा-विरोध आणि समाजात खामोश राहतात. यामुळे मुस्लीम समाजाविषयी भ्रम आणि कुंभाडाचा परिघ नको तितका विस्तारला गेला.

हल्लीची परिस्थिती आशा फुलवणारी आहे. मुल्ला-मौलवींना ऐकायचेही नाही आणि विरोधही करायचा नाही, हा पवित्रा घेऊन अनेक तरुण, संघटना, संस्था अनेक प्रश्न-समस्यांवर कामाला लागले आहेत. तरुण आणि तरुणी थोडी मवाळ भूमिका घेत का होईना, लिहिते होत आहेत. आपली बाजू, सत्य परिस्थिती, अफवेचे फॅक्ट फाईंडिंग मांडत आहेत. हिजाब, तलाक, तबलीग जमात, मस्जीद, अजान, भोंगा, हज, कुर्बानी, कश्मीर फाईल अशा अनेक मुद्यांना मुसलमानांच्या विरोधात वापरून द्वेषाचा बाजार सतत गजबलेला राहील याची दक्षता घेणाऱ्यांचे आभारच मानायला हवेत. कारण यामुळे या विषयांबाबत समाजात चर्चेची घुसळण होऊ लागली. लोक सत्य शोधून मतं मांडू लागली आणि मूठभर मुंडकी वगळता

बहुजन समाज खंबीरपणे मुसलमानांच्या बाजूने उभा राहिला.

या पार्श्वभूमीवर मुसलमानांचा दिनधरम, धर्माचरण, रितीपरंपरा, ईद, उरूस, कफन-दफन, चुकीच्या संकल्पना, अयोग्य व्याख्या, खोटी माहिती या बाबतची माहिती उघडपणे, स्पष्टपणे, सत्यतेने लोकांपुढे मांडून समाजाचे आकलनाचे, संवादाचे बहुमुखी मार्ग खुले करणे मला गरजेचे वाटले आणि यासाठी ही छोटी, सुटसुटीत पुस्तिका लिहून माझ्या सर्व भारतीय बांधवांच्या हाती सोपवत आहे. ही पुस्तिका फक्त मुस्लिमेतरांसाठी नाही, तर मुस्लीम बांधवांसाठीही गरजेची आहे. कारण सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे, धर्म आपल्याला पूर्णपणे कळलाच आहे असे समजणे फसवे असू शकते. तटस्थपणे भूमिका घेत समाजात प्रचलित असणाऱ्या प्रथा, परंपरा, व्याख्या, माहिती लिहिण्याचा मी प्रयत्न केला आहे, हे वाचकांना जाणवेलच. दोन समाजात दुवा साधण्याचा, संवाद वाढवण्याचा, प्रेम, आपलेपणा वृद्धिंगत करण्याचा हा प्रयत्न आहे. यातील माहिती अनेक पुस्तके, स्वानुभव, इंटरनेटवरून आणि मुसलमान कुटुंबात जन्मल्याने स्मृतीकप्प्यातून तसेच काही जाणकारांशी बोलून संकलित करून शब्दबद्ध केली आहे.

माझ्या प्रज्ञेला अनुसरून, माझ्या वकुबानुसार हे पुस्तक मी लिहिले आहे. ज्यांना आवडेल आणि माहिती पुरेसी नाही असे वाटेल, त्यांनी प्रयत्नपूर्वक आवर्जून सविस्तर माहिती, अधिकची माहिती असणारे पुस्तक, ग्रंथ लिहावा. ज्यांना आवडले नसेल त्यांनी विषयाचे महत्त्व ओळखून, संशोधन करून वास्तवाच्या अधिक समीप जाणारे पुस्तक लिहावे. दोन्ही प्रकारात मला आनंदच होईल. त्यांची इच्छा असल्यास मी शक्य ती मदतही करेन. पुन्हा अधोरेखित करते की पुस्तकातील आशयाचे खरे ज्ञान मलाच आहे, हे आणि इतकेच सत्य सिमित आहे, असा माझा दावा अजिबात नाही. भ्रम, अफवेची कोंडी फोडून संवादाचे, बंधुत्वाचे प्रभावी झरे प्रवाहित व्हावे आणि द्वेषाचे वणवे विझून प्रेमाचे नंदनवन फुलावे, हा आणि फक्त हाच यामागचा स्वच्छ हेतू आहे.

**– तमन्ना इनामदार**

■ □ ■

# प्रकाशकाचे मनोगत

दादा पुरव रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूटच्यावतीने तमन्ना इनामदार लिखित 'मुसलमान : माहिती, समज, गैरसमज' हे पुस्तक वाचकांच्या हाती देताना आम्हाला फार आनंद होत आहे. यानिमित्ताने ह्या पुस्तकाविषयीची आम्हां संपादक मंडळाची भूमिका इथे स्पष्ट करावीशी वाटते.

दादा पुरव रिसर्च व ट्रेनिंग इन्स्टिट्यूट ह्या संस्थेचा उद्देश मायक्रो फायनान्स, मायक्रो इन्शुरन्स व तळागाळातील कष्टकरी जनता यांच्याशी निगडित प्रश्नांवर संशोधन, अभ्यास करून लिहिलेली पुस्तके प्रकाशित करणे हा आहे. २००८ सालापासून ते आत्तापर्यंत दरवर्षी अशा प्रकारची पुस्तके आम्ही प्रकाशित केलेली आहेत.

२०२२ साली मात्र समाजामध्ये धर्माविषयीची उलट सुलट चर्चा वाढली व मुस्लिमांविरुद्ध कडवट वातावरण तयार झाले असे आम्हाला वाटते. यामध्ये मुस्लीम मुलींनी हिजाब घालावा की घालू नये ? मशिदीवर भोंगे लावू नये.... अशा प्रकारच्या अनेक विषयांवर बहुसंख्याक हिंदूंची एक दुराग्रही भूमिका तयार करण्यामध्ये राजकीय पुढाकार दिसून आला. अशा परिस्थितीत आम्ही ऑगस्टमध्ये दादा पुरव यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'धर्म व संविधान' हे सुरेश सावंत लिखित पुस्तक प्रकाशित केले. ह्यानिमित्ताने आम्ही 'धर्म, धार्मिकता आणि धर्मांधता' या विषयावर एक परिसंवाद

घडवून आणला. या परिसंवादामध्ये पाच वक्त्यांनी वेगवेगळ्या धर्मांविषयी त्यांचे विचार मांडले. श्री. प्रमोद मुजुमदार यांनी अध्यक्षस्थानी राहून याचे उत्कृष्ट असे विवेचन व समारोप केला.

या परिसंवादात तमन्ना इनामदार यांनी मुस्लीम धर्मांविषयीची मांडणी केली. त्यामध्ये त्यांनी अत्यंत कळकळीने मांडले की सर्वसामान्य मुस्लीम बांधव व महिला ह्या दोन्ही बाजूंनी भरडल्या जात आहेत. एक म्हणजे स्वतः मुस्लीम धर्मामधील धार्मिक अंधश्रद्धा व मुल्ला-मौलवींचा प्रभाव आणि दुसऱ्या बाजूला बहुसंख्याक हिंदूंमध्ये मुद्दाम पसरवले जाणारे अपसमज किंवा गैरसमज. यामुळे समाजात घडणाऱ्या प्रत्येक दुर्घटनेला किंवा चुकीच्या गोष्टीला जबाबदार मुस्लिमांना धरले जाते व त्यामुळे हा समाज एक प्रकारच्या निराशेच्या गर्तेत जात आहे. तमन्नाताईंच्या ह्या मांडणीतील कळकळ व तळमळ आम्हाला भिडली. त्याच कार्यक्रमानंतर त्यांनी सांगितले की, मुस्लीम धर्मांविषयीची माहिती व समज-गैरसमजांबद्दल त्यांनी एक छोटी पुस्तिका लिहिली आहे. उभयतांच्या चर्चेतून ती पुस्तिका 'दादा पुरव रिसर्च व ट्रेनिंग इन्स्टिटच्यूट' मार्फत प्रकाशित करण्याचे ठरले. हाडाच्या कार्यकर्त्या असलेल्या, मुस्लीम समाजातील एक अभ्यासू व्यक्ती अशा तमन्नाताईंचे हे छोटेखानी पुस्तक प्रकाशित करण्याचा निर्णय आम्ही ह्याच पार्श्वभूमीवर घेतला.

तमन्नाताईंच्या प्रास्ताविकामध्ये त्यांनी म्हटल्याप्रमाणे ही पुस्तिका मुस्लीम धर्मांविषयीची समग्र पुस्तिका आहे, असा त्यांचा दावा नाही व संपादक मंडळ म्हणून आमचाही दावा नाही; परंतु मुस्लीम धर्मांविषयी, साध्यासुध्या चालीरीती, रिवाज यांच्याबद्दल माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावी, त्यानिमित्ताने एक संवाद सुरू व्हावा, विचारांची देवाण-घेवाण व्हावी व मुस्लीम नागरिक हे भारत देशाचे आपल्यासारखेच सर्वसामान्य नागरिक आहेत, अशा प्रकारची त्यांना सामावून घेणारी भूमिका तयार होण्यामध्ये या पुस्तिकेने थोडासा वाटा उचलला तरी आम्हाला आनंद होईल व यातच या पुस्तिकेचे यश असेल.

**- डॉ. मेधा पुरव सामंत**

दादा पुरव रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट

# अंतरंग


☐ इस्लाम / ९
☐ मुसलमानी संस्कृती, रिवाज आणि परंपरा / १७
☐ ईद आणि इतर उत्सव / १९
☐ निकाह, तलाक आणि हलाला / २९
☐ कफन - दफनविधी / ४०
☐ प्रचलित शब्द आणि खरे अर्थ / ४५
☐ समज आणि गैरसमज / ५०


■ ☐ ■

# इस्लाम

## स्थापना आणि उगम

इस्लाम धर्माबाबत सविस्तर जाणून घेण्याआधी 'इस्लाम' शब्दाचा अर्थ जाणून घेणे महत्त्वाचे आहे. इस्लाम हा शब्द अरबी भाषेतल्या दोन शब्दांद्वारे तयार झाला आहे. पहिला 'सलाम' म्हणजे शांती आणि दुसरा शब्द 'सिल्म' म्हणजे त्या सर्व शक्तिमान अल्लाहसमोर पूर्णत: समर्पित होणे वा नतमस्तक होणे.

इस्लामचे अवतरण वा उगम साधारणपणे सातव्या शतकाच्या सुरुवातीस अरब देशात झाला. हजरत मोहंमद पैगंबरांनी या धर्माची स्थापना केली. या अर्थाने इस्लामचे संस्थापक हजरत मोहंमद पैगंबर साहेब आहेत.

इस्लाम धर्माच्या तत्त्वांचे पालन करणाऱ्या अनुयायींना 'मुसलमान' म्हणतात. 'कुराण' हा मुसलमानांचा धर्मग्रंथ आहे. मस्जीद हे मुसलमानांचे प्रार्थनास्थळ आहे. इस्लाम हा जगातील दोन क्रमांकाचा सर्वांत मोठा धर्म आहे आणि भारतातही इस्लाम दोन क्रमांकावर असणारा सर्वांत मोठा धर्म आहे. इस्लाममधीलच विविध विचारधारांचे पालन करणारे अनुयायी जगभरात विखुरलेले आहेत. तत्त्व आणि आचरणात थोड्याफार फरकामुळे मुसलमान समाजाचे शिया, सुन्नी, शाफई, हंबली, अहमदिया असे पंथ - सिलसिले आहेत. उत्सुकता असणारे आणि सविस्तर माहितीची अपेक्षा

असणाऱ्यांनी यावर उपलब्ध विविध पुस्तके, माहिती, लेख मदतीला घ्यावेत. नेटवर, गुगलवरूनही माहितीचे स्त्रोत पाहावेत; पण तपासून घ्यावेत. भारतात सुन्नी आणि शिया पंथीय मोठ्या प्रमाणात आहेत. इतर विचारधारेचे अनुयायीही आहेत. इस्लामिक विचारधारेच्या सर्व समूहाला 'मुस्लीम' म्हणतात.

## इस्लामची पाच मुख्य तत्त्वे

**१) शहादा** – म्हणजे कलमा. साक्ष देणे वा मान्य करणे की अल्लाह व्यतिरिक्त कोणी दुसरा परमेश्वर नाही आणि मोहंमद पैगंबर साहेब हे अल्लाहने पाठवलेले दूत आहेत.

**२) सलात किंवा नमाज** – म्हणजे एका विशिष्ट नियमानुसार केलेली प्रार्थना होय. १) फजर म्हणजे सूर्योदयाच्यावेळी केलेली नमाज. २) जोहर म्हणजे माध्यान्हाची नमाज. ३) असर म्हणजे संध्याकाळच्या सुरुवातीस पढली जाणारी नमाज. ४) मगरीला - दिवेलागण झाल्यावर म्हणजे सूर्यास्तानंतरची नमाज. ५) इशा म्हणजे रात्री झोपण्यापूर्वी कृतज्ञता व्यक्त करायची नमाज.

याशिवायही दिवसात काही नमाज आहेत. ज्या ऐच्छिक आहेत. नमाजचा उद्देश अल्लाहप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची प्रार्थना होय. नमाज ही मुसलमानांची प्रार्थना पद्धती आहे.

**३) सोम किंवा रोजा** – सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत तहान, भूक, वासना, लोभ, हिंसा, पाप, अपशब्द, वाईट विचारांपासून परावृत्त राहण्यासाठी इंद्रीय आणि पोटाचा उपवास म्हणजे रोजा होय.

**४) जकात** – म्हणजे दरवर्षी रमजान महिन्यात करावयाचे दान. सक्षम असणाऱ्या मुसलमानाने आपल्या वार्षिक उत्पन्नातून २.५% रक्कम बाजूला काढून निर्धन, गरीब, अपंग, विधवा, अनाथ लोकांना द्यायची असते. वार्षिक उत्पन्न व एकंदरीत मालमत्ता गृहीत धरून रक्कम काढायची असते.

**५) हज** – ही धार्मिक यात्रा आहे. इस्लामिक कॅलेंडरनुसार बाराव्या महिन्यात अरब देशातील मक्का शहराला भेट देऊन पारंपरिक

धार्मिक विधी पूर्ण करणे.

याचाच आणखी एक प्रकार म्हणजे 'उमराह.' ज्यांना हज शक्य नसेल ते उमराह म्हणजे छोटी धार्मिक यात्रा करतात.

## हजरत मोहंमद पैगंबर (प्रेषित)

इस्लामपूर्व काळात अरब समुदाय वेगवेगळ्या टोळ्यांमध्ये विभागलेला होता. पैगंबरांचा जन्म मक्केमध्ये सोमवार, दि. २० एप्रिल इ. स. ५७० ला झाला. त्यांच्या आईचे नाव अमिनाबी आणि वडिलांचे नाव अब्दुल्लाह होते. पैगंबरांच्या जन्माआधीच त्यांच्या पित्याचे निधन झाले, तर सहा वर्षांचे असताना आईची मायाही हरपली. त्यामुळे आजोबांनी आणि त्यांच्या निधनानंतर काकांनी संगोपन केले. पैगंबरांचे बालपण अतिशय गरिबी आणि हलाखीत गेले. ते मेंढपाळ होते. पुढे ते व्यापारी आणि त्यानंतर राज्यकर्ते झाले.

पैगंबर मक्केपासून दहा-बारा कि. मी. दूर असलेल्या हिरा नावाच्या गुहेत एकांतात चिंतन-मनन करत बसत. इ. स. ६१०च्या रमजान महिन्यातल्या २६-२७ तारखेला अल्लाहचे दूत 'जिब्रईल'चा साक्षात्कार झाला आणि त्यांनी पैगंबरांना अल्लाहचा संदेश 'इक्रा' म्हणून दिला. म्हणजे 'वाच किंवा पठण कर.' त्यानंतर २२ वर्षे वेळोवेळी अल्लाहकडून 'वही' (संदेश) येत होते आणि दूत जिब्रईल ते पैगंबरांकडून मुखोद्गत करून घेत होते. हेच कुराणचे अवतरण होय. कुराण हा मुसलमानांचा धर्मग्रंथ आहे. कुराणातील मुख्य संकल्पना एकेश्वरवादावर आधारलेली आहे. इ. स. ६१३ पासून त्यांनी लोकांना इस्लाम धर्माची शिकवण द्यायला सुरुवात केली. तेव्हाच 'इस्लाम' धर्माचा जन्म झाला. ही प्रक्रिया पैगंबरांच्या निर्वाणापर्यंत म्हणजे इ. स. ६३२ पर्यंत सुरू होती. इ. स. ६३२ मध्ये पैगंबरांनी जगाचा निरोप घेतला.

**सिलसिले** - पैगंबरांच्या निधनानंतर उत्तराधिकारी झालेल्या खलिफांच्या (उत्तराधिकारी) विविध विचारधारांना 'सिलसिले' (पंथ) म्हणतात.

**हिजरत** - म्हणजे स्थलांतर. पैगंबरांच्या हिजरतपासून अरबी

कालगणनेला सुरुवात झाली. पैगंबरांनी आणलेल्या नव्या धर्मातील तत्त्वांमुळे सामान्यजन इस्लामकडे आकर्षित होत असलेले पाहून मक्केतील श्रीमंत व्यापारी, प्रतिष्ठितांनी त्यांना विविध मार्गांनी, विविध पद्धतींनी त्रास देणे, हल्ले करणे, जिवे मारण्याचा प्रयत्न सुरू केल्याने त्यांना मक्का सोडून मदिनेकडे प्रस्थान करावे लागले, ज्याला 'हिजरत' म्हणतात. त्यानंतर कालगणना हिजरी सुरू झाली.

इंग्रजी महिन्यानुसार अरबी-उर्दूतील बारा महिन्यांची नावे पुढील प्रमाणे आहे. १) मोहरम २) सफर ३) रबिलावल ४) रब्बीलाखर ५) जमादिलावल ६) जमादिलाखर ७) रज्जब ८) शाबान ९) रमजान १०) शव्वाल ११) जिल्काद १२) जिल्हेद.

सध्या हिजरी सन १४४३ सुरू आहे.

इस्लामची नव्या दिवसाची सुरुवात चंद्रोदयानंतर होते. चंद्रदर्शनाला म्हणूनच असाधारण महत्त्व आहे. चंद्र दिसल्यावरच दुसऱ्या दिवशी ईदची घोषणा केली जाते.

## इस्लामचे भारतातील आगमन आणि प्रसार

इस्लामच्या आगमनापूर्वीही अरब देशातून व्यापारी समुद्रमार्गे भारतात व्यापार उदीमा करिता येत होते. काही व्यापारी इथेच स्थाईक झाले. दक्षिणेत ७व्या शतकानंतर आलेले कोकण, मलबार, कच्छ भागात स्थिरावले. धर्मप्रसार हा त्यांचा हेतू नव्हता. ते फक्त व्यापाराच्या उद्देशाने भारीत होते. काही राजांच्यासोबत आलेले योद्धे, सैनिक आणि सुफी संतांमुळे १२व्या शतकानंतर भारतात इस्लामचा खरा विस्तार झाला.

सुफींची प्रेम आणि समतेची शिकवण तत्कालीन परिस्थिती, राजकीय लाभाचा हेतू, राजघराण्याची कृपामर्जी इत्यादी अनेक कारणांमुळे इथल्या भूमीपुत्रांनी इस्लामधर्म स्वीकारला. यात गोरगरीब, वंचित, शोषित जसे होते तसे उच्चवर्णीयांचाही समावेश होता. इस्लामची स्थापना होऊन हजार वर्षे होऊनही मुसलमान भारतात अल्पसंख्याक आहेत.

मुसलमानांची मातृभाषा उर्दू वा अरबी नसून 'दखनी' आहे. आजही मुसलमानांची मुख्य भाषा दखनी आहे. मराठी व्याकरण असलेली, स्थानिक

शब्दांची रेलचेल असणारी आणि अनेक भारतीय भाषांतील शब्दांच्या मिश्रणातून 'दखनी' या स्वतंत्र भाषेचा विकास झालेला दिसतो.

आर्थिक, सामाजिक दर्ज्यानुसार समाजाचे तीन स्तर दिसतात.

१) अश्रफ - म्हणजे उच्चवर्णीय. ज्याचे पूर्वज अरब देशातून येऊन इथे स्थाईक झाले होते. यांचे प्रमाण १०-१५% आहे.

२) अजलफ - मध्यमवर्गीय. छोटेमोठे व्यापारी, कष्टकरी, लघु उत्पादक, उद्योजकांचा यात समावेश आहे. यांचे सर्वांत जास्त म्हणजे ५५% प्रमाण आहे.

३) अरजल - भटके, विमुक्त जातीजमातींचे म्हणजे दलित (पसमांदा) समाज होय. यांचे प्रमाण ३०% आहे.

**सुन्नी-तबलिगी -** सुन्नी आणि तबलिगी वेगवेगळी विचारधारा राखणारे समूह आहेत. कुराण, दिन, अल्लाह समानतत्त्व असले तरी विचारांत थोडासा फरक आहे. ढोबळमानाने असे म्हणता येईल की, सुन्नी समुदाय पीर-पैगंबर, वली-दर्गा मानतात, तर तबलिगी अल्लाहला सर्वस्व मानतात. साधारण अल्प परिचय असा होऊ शकतो.

## तबलिगी जमात

हा धार्मिक समूह मुसलमानांना दिनचे म्हणजे धर्माची शिकवण देऊन अल्लाहची खिदमत (सेवा) करण्यासाठी निमंत्रित करतो. हा समूह गावोगावी, घरोघर जाऊन लोकांना सद्वर्तन, नमाज, रोजा, दान, कुराण पठण शिकवतो. या समूहाला 'जमात' म्हणतात. जमात इच्छुक सदस्यांना एकत्र करून एखाद्या गावी, एखाद्या मस्जीदमध्ये जाऊन तिथल्या स्थानिक मुस्लीम रहिवाशांना नमाज, कुराण शिकवतो, धार्मिक माहिती देतो. ही जमात तीन दिवस, आठ दिवस, महिना, तीन महिने, वर्ष, दोन वर्षांसाठी एकत्र असते. जमातीत सहभागी होणाऱ्या सदस्याला जमातच्या संघटकांनी ठरवलेली फी द्यावी लागते. स्थानिक मस्जीदमध्ये, मदरशात राहायची व्यवस्था होते. गरजेपुरते सामान आणि शिधा सोबत असते. आळीपाळीने काम वाटून घेऊन प्रसंगी हाताने स्वयंपाक करून खातात. मोठ्या जमातींचे जर आयोजन असेल, तर आयोजक सर्व व्यवस्था करतात. अत्यंत साधी

राहणी, शिस्तबद्ध वागणे, नमाज-कुराण पठण आणि जिक्र म्हणजे नामस्मरण अशी दैनंदिनी असते. सद्‌वर्तन, नैतिक आचरण, अल्लाहप्रती कृतज्ञता शिकवली जाते.

## सुन्नी

या विचारांचे लोक दर्गा, पीर, वली मानतात. फतिहा देणे, दर्ग्यात दर्शनाला जाणे, उरूस, कंदोरी (बकरे कापून जेवण) करणे, न्याज, मन्नत करणे योग्य समजतात.

तबलिगी - सुन्नी पंथाविषयी हा साधारण परिचय आहे.

## मस्जीद काय आहे ?

मस्जीद हे नमाज पढण्यासाठी एकत्र येण्याचे ठिकाण आहे. स्थानिक सदस्यांच्या प्रयत्नांतून क्षमतेनुसार मस्जीद बांधली जाते. अगदी दहा बाय दहाच्या जागेतही ती असू शकते. काही ठिकाणी भव्य दोन-चार मजलेही चढवतात. आत नमाज पढण्यासाठी मोठ्या चटया, गालीचे अंथरलेले असतात. पंखे, लाईट, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी आणि वजूसाठी पाण्याची सोय असते. मस्जीदमध्ये कोणतीही मूर्ती, फोटो, मजार (थडगे) काहीही नसते. मध्यभागी एक मोठी मेहराब (देवळी) असते. तिथे उंचावर कुराण ठेवलेले असते.

मस्जीदच्या देखरेखीसाठी समिती असते. लोकांच्या देणग्या, स्थानिकांकडून वर्गणी घेऊन निधी जमवला जातो. त्या निधीतून नमाज पढवणारे इमाम, अजान देणारा बांगी, स्वच्छता ठेवणारे सफाई कामगार यांना पगार देणे, बिलं भागवणे होते. शिवाय रमजान महिन्यात मिळणाऱ्या जकातच्या पैशातून रमजानच्या महिन्यात महिनाभर 'तरावीह' पढवणाऱ्या आणि इतर सेवेकऱ्यांना मानधन दिले जाते.

स्त्रिया घरात नमाज पढतात. पैगंबर काळात स्त्रियाही मस्जीदमध्ये नमाज पढत असल्याचे दाखले वाचावयास मिळतात. कालांतराने स्त्रियांवर बंदी घातली गेली. याला इस्लाम धर्मात काही आधार दिसत नाही. ही केवळ पुरुषी मानसिकता आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यातल्या एका दाम्पत्याने स्त्रियांना मस्जीदमध्ये प्रवेश मिळावा यासाठी हायकोर्टात याचिका दाखल

केली. हायकोर्टाने सर्व पुरावे, दाखले, युक्तिवादाचा अभ्यास करून स्त्रियांना मस्जीद प्रवेशाचे दरवाजे खुले केले. तरी स्त्रिया मस्जीदमध्ये नमाज पढण्यास जाण्यास उत्सुक नसतात. याला कारण स्त्रीवर लादलेली परंपरागत दुय्यमत्वाची शिकवण असावी असे वाटते. तसेच दर्गा प्रवेशाचेही आहे.

**नियत बांधना** – म्हणजे अल्लाहला साक्ष मानून हे काम करत आहे, अल्लाह यात तुझी कृपादृष्टी असू दे असे म्हणणे.

**वजू करणे** – नमाज पढण्यापूर्वी हात, पाय, कान, कान-माने मागचा भाग स्वच्छ करणे, चूळ भरणे या विशिष्ट पद्धतीने हातपाय धुण्याच्या प्रकाराला 'वजू करणे' म्हणतात. वजू करताना अल्लाहला साक्ष ठेवून वजू करत असल्याची इच्छा मनात बोलली जाते, तिला नियत बांधना म्हणजेच इच्छा करणे म्हणतात.

मुसलमानांत दैनंदिन जीवनात अल्लाहप्रती कृतज्ञता व्यक्त करणे आणि त्याची कृपादृष्टी मिळवण्याच्या उद्देशाने प्रत्येक काम करताना नियत बांधली जाते. घरात येताना, बाहेर जाताना, झोपतानाही काम करण्याआधी नियत म्हणतात.

**ईदगाह** – ज्या गाव-शहरात ईदच्या नमाजासाठी मस्जीदची जागा कमी पडते, तिथे एखाद्या मोठ्या मैदानात एकत्र येऊन नमाज अदा केली जाते. त्या मैदानाला 'ईदगाह मैदान' म्हणतात. आयोजक शक्य तितक्या चटयांची सोय करतात. बाकी नमाज पढणारे घरून वजू करून आपापल्या चादरी घेऊन जातात. इस्लाममध्ये मोठ्या समूहाने एकत्र नमाज पढण्याला विशेष महत्त्व आहे. याचे कारण मोठ्या समूहाने एकत्र येऊन नमाज पढण्याने एकोपा वाढतो, सांघिक भावना वाढीस लागते, गरीब-श्रीमंत भेद गळून पडतात, बंधुभाव वाढतो.

**किबला** – नमाज नेहमी उगवतीच्या दिशेला तोंड करून पढतात. त्या दिशेला 'किबला' म्हणतात.

## मदरसा

मदरसा म्हणजे धार्मिक शिक्षण देणारी संस्था. जिथे नमाज-कुराण पठण, अरबी भाषा व अन्य धार्मिक विधी परंपरांबाबत शिक्षण दिले जाते.

शिक्षणाच्या  कालावधीनुसार पदव्या दिल्या जातात. तसेच मदरशात सद्‌वर्तन, अखलाख म्हणजे नैतिक वर्तन, चरित्र कसे असावे हे शिकवले जाते. शिवाय कुराण मुखोद्‌गत करणे, इस्लामचा इतिहास वगैरे बाबींबाबत शिकवले जाते. याच्या परीक्षाही होतात आणि त्यानुसार पदवी मिळते. यात मौलाना, आलिम, मुफ्ती, कारी, कामिल, फाजिल दर्जा असतो. कुराण हाफिज म्हणजे संपूर्ण कुराण मुखोद्‌गत असणारा इसम.

**हदिस**

हदिस हा अरबी शब्द आहे. याचा अर्थ वर्णन किंवा विवरण होय. इस्लामचे पैगंबर मोहंमद साहेबांचे त्यांच्या हयातीतले जीवनाचरण, सवयी, कामे आणि आदेशांचे, उपदेशांचे वर्णन करणारा जो संग्रह आहे त्यास हादिस म्हणतात. वेगवेगळ्या विद्वानांनी, अनुयायांनी लिहिलेली हदिसची अनेक पुस्तके आहेत. पैगंबरांच्या आदेशानुसार वा जीवन वर्णनानुसार दैनंदिन जीवन जगण्याचा प्रयत्न करणे याला 'नबीकी सुन्नत' म्हणतात.

हदिस पैगंबरांचे आदेश, उपदेश, वर्तन संदेश आहे, तर कुराण ईश्वरीय वाणी आहे, जी अल्लाहचे दूत हजरत (माननीय) जीब्राईल तर्फे पैगंबरांना सांगितले गेले.

'वही'चे अवतरणे म्हणजे पैगंबरांच्या साक्षात्कारी समाधी अवस्थेत ईश्वराचे आदेश त्यांच्या मुखातून प्रकट होणे.

**शरीयत वा शरिया** – इस्लामिक कायदा व्यवस्थेला 'शरिया कानून' म्हणतात. कुराण आणि इस्लामच्या विद्वानांच्या अभ्यास आणि निर्णयांवर आधारलेले हे कायदे आहेत.

■ □ ■

# मुसलमानी संस्कृती, रिवाज आणि परंपरा

भारतात इस्लाम जरी बाहेरून आला असला तरी मुसलमान इथलेच मूलनिवासी भारतीय आहेत, हे आधी समजून घेणे महत्त्वाचे आहे. त्या काळात वेगवेगळ्या कारणांमुळे इथल्या लोकांनी धर्म बदलला. भारतीय लोकांनी धर्मांतरण करून मुसलमान होऊन इस्लाम स्वीकारला खरा; पण यामुळे केवळ प्रार्थना पद्धती बदलली. रिती, संस्कृती, परंपरा, व्यवसाय बहुतांशी त्या आणि तशाच राहिल्या. काही अपवाद किंवा अनिवार्य बदल झाले आहेत तेही केवळ धर्माचे प्रतीक म्हणून. शिवाय पेहराव, खानपान, व्यवसाय, भाषा यात पूर्णपणे फरक पडला नाही. त्याकाळी तर हा भेद अजिबात नव्हता. अलीकडे शहरात पेहरावातील वेगळेपणामुळे मुस्लीम वेगळे दिसतात. पूर्वी सहावारी, नऊवारी साडी-चोळी, परकर-चोळी, धोतर, विजार, बंडी, मुंडासे, खमीज, डोक्यावर टोपी असा सरसकट सर्वांचा पोषाख असे. आताही बऱ्याच ठिकाणी वृद्धांचा पोषाख असाच आहे. बाकी बुरखा, हिजाब, दाढी, टोपी, विजार, कुर्ता सामान्यपणे पाहायला मिळतो.

पर्दा पद्धतीत वापरले जाणारे विविध पेहराव प्रकार म्हणजे हिजाब, नकाब, बुरखा, मखना, अबाया होय.

**हिजाब** - म्हणजे डोके रूमाल वा ओढणीने आच्छादून घेणे. मुख्य उद्देश केस दिसू नये.

**नकाब** - म्हणजे डोळे उघडे ठेवून नाकासमोर विशिष्ट पद्धतीने कापड बांधणे. उद्देश - चेहरा दिसू नये.

**बुरखा –** म्हणजे एकाच घोळदार पेहरावाने नखशिखांत शरीर झाकणे. काहीजण हातात मोजेही घालतात. उद्देश संपूर्ण शरीर झाकले जावे.

**मखना –** म्हणजे अंग आणि डोके आच्छादनाद्वारे विशिष्ट प्रकाराने तयार केलेली गोलसर ओढणी.

**अबाया –** म्हणजे चेहरा फक्त उघडा ठेवून संपूर्ण अंग झाकणारे ओढणीसारखे दिसणारे घोळदार कापड होय.

बुरखा काळ्याच रंगाचा असावा, अशी सक्ती नाही. वेगवेगळ्या रंगाचे, विविध प्रकारच्या कापडाचे किंवा हवे त्या रंगाचे मॅचिंग बुरखा, मखना, हिजाब, अबाया, नकाब वापरतात. पूर्वी घोळदार, डोळ्यांसमोर जाळी असणारे बुरखे स्त्रिया वापरत. ते कधी एक भागाचे वा दोन भागाचे असत. हल्ली शरीराच्या मापाचे, फिटींगमध्ये असणारे, भरतकाम, लेस, टिकल्या, मोती, खडे, चमकी, कृत्रिम फुले, पाने लावलेले बुरखेही बाजारात उपलब्ध आहेत.

## पुरुषांचा पोषाख

सर्वसाधारणपणे त्या त्या भागात इतरजण वापरतात त्याच प्रकारचे कपडे मुस्लीम पुरुष वापरतात. धार्मिक मुसलमान शरीयतला अनुसरून म्हणजे पैगंबरांचे वर्तन डोळ्यांसमोर ठेवून टोपी, कुर्ता, विजार, खमीज वा पठाणी ड्रेस ज्यात खमीज आणि रूंद पायाची असणारी सलवार असते. शक्यतो पांढरा रंग असतो. कारण पांढरा रंग पवित्र, शांत, पाक म्हणजेच स्वच्छ समजला जातो.

**गुस्ल देना/गुस्ल लेना –** म्हणजे आधी वजू करून पाकी अंगीकारत म्हणजे शूचिर्भूत होत असल्याची नियत करणे. मग ज्या कारणासाठी पाक होत आहे उदा. नमाजासाठी, फातिहासाठी, ईदच्या नमाजासाठी, मयताला आंघोळ घालत असल्यास त्याचा उल्लेख करून, अल्लाह साथ आहे आणि तोंड किबल्याच्या दिशेने करून अल्लाह मी तुझ्या आदेशाचे पालन करत आहे, असे म्हणून पाण्यात फुकून ते पाणी वजू/आंघोळीसाठी वापरले जाते.

■ □ ■

# ईद आणि इतर उत्सव

ईद म्हणजे सण. भारतीय मुसलमानांत रमजान ईद (ईद उल फित्र) आणि बकरी ईद (ईद उल अजहा) हे महत्त्वाचे दोन सण आहेत. याशिवाय मोहरम (ताजिया), पैगंबर जयंती (ईद-ए-मिलाद), ग्यारहवी शरीफ, रज्जबके कुडे, बडोंकी ईद, पवित्र रात्र जसे शब-ए-महेराज, शब-ए-बारात आणि रमजानची सत्ताविसावी रात्र - शब-ए-कद्रला ही विशेष महत्त्व आहे. शिवाय सुन्नी परंपरेचे लोक स्थानिक पिरबाबांचा वलीचा, दर्ग्याचा उरूस ही विशेष आदराने साजरा करतात.

**रमजान ईद**

मुसलमानांत या ईदला आत्यंतिक महत्त्व आहे. चंद्रदर्शनानंतर रमजान महिना आणि रमजानचे रोजे प्रारंभ होतात. या महिन्याला 'इबादत का महिना' म्हणूनही अधिक आदराचे स्थान आहे. चंद्रदर्शनाच्या पहाटे सहेरीसाठी उठून रोजा धरतात. रोजा म्हणजे उपवास, सहेरी म्हणजे रोजा धरण्याच्या इच्छेने पहाटे सूर्योदयापूर्वी केलेली न्याहारी होय. यासाठी कोणी रात्रीच तयारी करून ठेवते, तर कोणी पहाटे दोन-तीनला उठून सगळा ताजा, गरम स्वयंपाक करतात. न्याहारीसाठी सगळे खाद्यपदार्थ, आहार मांसाहारी, शाकाहारी वा मिश्रहरी आवडीनुसार आणि परवडेल असे भोजन करून कुटुंबातील सदस्य रोजा करतात. याला 'सहेरी' म्हणतात. सहेरी आणि इफ्तारी (रोजा सोडणे)चे चंद्रोदय व सूर्यास्तानुसार टाईमटेबल तयार करून सेवाभावी लोक मस्जीदमध्ये वाटतात. त्यानुसार सहेरी-इफ्तारीची वेळ असते.

सहेरीच्या वेळेनंतर काहीही खायचे, प्यायचे नसते. थुंकी गिळणे, खाद्यपदार्थाचे सुवास घेणे यांपासून स्वत:ला दूर ठेवतात. रोजा दरम्यान खोटे बोलणे, शोषण करणे, चोरी करणे, अधिकाराचे हनन करणे, अपशब्द, निंदा, चुगली, चहाडी करू नये, वाईट बोलू नये, पाहू नये, ऐकू नये. रोजा पोटासह सर्व इंद्रियांवर नियंत्रण शिकवतो. गुन्हे करण्यापासून परावृत्त करतो. तसेच भुकेल्याच्या, तहानलेल्याची, भावनिक, मानसिक, शारीरिक स्थितीचा अनुभव आल्याने वेदनेची कल्पना येते. अन्न-पाण्याचे मोल आणि महत्त्व कळते.

सहेरीची वेळ संपली की, फजरच्या नमाजाची अजान होते. पुरुष, स्त्रिया, मुले नमाज पढतात आणि दिवस सुरू होतो. संध्याकाळी तीन-चार वाजल्यापासून घरातील महिला रोजा इफ्तारीची तयारी करतात. फळे, सरबत, मांसाहारी, शाकाहारी पदार्थ, खजूर इत्यादी पदार्थ जेवण्याची छोटी चादर जिला 'दस्तरखान' म्हणतात, ते अंथरून सर्व पदार्थांच्या प्लेटस् मांडून, त्याभोवती कुटुंबातील सर्व सदस्य बसतात आणि वेळ होताच नियत म्हणतात. म्हणजे अल्लाहने रोजा, भक्ती, श्रद्धा स्वीकारावी, सर्व गुन्हे माफ करावे, ही विनंती करतात आणि रोजा पूर्ण करायची शक्ती आणि आता इफ्तारीसाठी अन्न पुरवले म्हणून धन्यवाद/कृतज्ञता मानून रोजा सोडतात. लगेच मगरिबची नमाजची वेळ होते. जो तो नमाज पढतो. नमाज पढल्यावर रात्रीची जेवणं झाली की 'तराबीह'ची नमाज होते. पुरुष मस्जीदमध्ये तर स्त्रिया घरात नमाज अदा करतात. तराबीहच्या नमाजमध्ये महिन्याभरात कुराणचे पठण करतात.

**रोजाची रस्म :** वयाच्या सातव्या वर्षापासून लहान मुलांनी रोजे करावे, अशी मान्यता आहे. सातव्या-आठव्या वर्षी वा कधीही लहान मुलांनी पहिला रोजा पूर्ण केल्यास कुटुंबीयांना अमाप आनंद होतो. रोजदाराचे कौतुक करण्यासाठी आणि आनंद व्यक्त करण्यासाठी काही लोक रोजदाराला नवीन कपडे, फुलांचा हार, शेरा हौसेने घालतात. रोजा इफ्तारीनंतर आसपासचे शेजारी, नातेवाईक, ज्येष्ठमंडळींना भेटवून आणतात. सगळे रोजदाराचे कौतुक करतात, काही भेट वा खाऊसाठी पैसे नजराना म्हणून देतात. हा वैयक्तिक हौसेचा, आनंद व्यक्त करण्याचा

मार्ग आहे.

अशाप्रकारे महिनाभर रोजे झाल्यानंतर चंद्रदर्शनानंतर दुसऱ्या दिवशी ईद होते. रमजान महिना अनेक अर्थानेही आपले महत्त्व राखतो. या महिन्यात धनिक लोकांनी आपल्या एकूण संपत्तीवर अडीच टक्के रक्कम वेगळी काढून गरीब, गरजू, निर्धन नातेवाईक, शेजारी, गावातले, शहरातल्या लोकांना द्यावी असा आदेश आहे. याला 'जकात' म्हणतात. यामुळे समाजातील सर्वच घटकांची गरज पूर्ण होऊन सगळ्यांची ईद आनंदात साजरी होईल. या महिन्यात इबादतसह दान-पुण्यालाही खूप महत्त्व आहे. सदका म्हणजे जीव आणि मालमत्तेचे रक्षणाची दुवा म्हणून कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या नावे गहू, कपडे, टॉवेल, लुंगी, टोप्या व इतर गरजेच्या वस्तू दान करतात. दररोज इफ्तारीसाठी मस्जीदमध्ये लोक विविध पदार्थ घेऊन जातात. ते सोलून, तुकडे करून ताटात सजवून येणारे सर्व चौफेर बसून रोजा इफ्तारी करतात. घरातही इफ्तारीसाठी दररोज तयार होणारे वेगवेगळे पदार्थ शेजारी, नातलगांना ताटात सजवून देतात. या सर्व कामात महिनाभर घरातील स्त्रियांचे कष्ट, योगदान महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

ईद अतिउच्च आनंदाचा समारोह असतो. पहाटेपासून घाई, गडबड सुरू असते. त्या आधी आठवडाभर आधीपासून घराला रंगरंगोटी करणे, सजावट करणे, स्वच्छता करणे सुरू असते. घर, बिल्डिंग, गल्ली, वाडे, मोहल्ला लाईटिंग वा पताके लावून सजवतात. मस्जीदही सजवली जाते. सगळीकडे हर्षोल्लाहासाचा माहोल असतो. अबालवृद्ध उत्साहात तयारी करत असतात. नवीन कपडे, नवीन चपला, बूट, बुरखे, असली-नकली दागिने खरेदी, बांगड्या, अत्तर, सुरमा, मेहंदी आणि शिरखुरम्यासाठी सुक्यामेव्याची, शेवयांची, केशर, साखर, तुपाची, दुधाची खरेदी होते. मेवा भिजत घालून बारीक चिरून ठेवतात. पहाटेपासून दूध आटवायला ठेवतात. नमाजाच्या आधी शिरखुर्मा तयार होतो. घरातून काहीतरी गोड खाऊन मंडळी अत्तर, सुरमा लावून, नवीन कपडे घालून नमाजला मस्जीद वा ईदगाह मैदानात जातात. स्त्रिया घरात शुक्राना (कृतज्ञता) नमाज पढतात. या ईदला 'मिठी ईद'ही म्हणतात.

नमाज झाल्यावर सगळे एकमेकांची गळाभेट घेत 'ईद मुबारक' म्हणतात. दुवा देतात, घेतात. या दिवशी छोट्या मुलांची चंगळ असते. ते ज्यांना ज्यांना भेटून 'ईद मुबारक' म्हणतात, ते सगळे त्यांना 'ईदी' म्हणून रोख रक्कम क्वचित भेटवस्तू देतात. नमाज नंतरही भरपूर 'खैरात' म्हणजे दान केले जाते. एकमेकांच्या नातेवाईकांच्या, शेजाऱ्यांच्या घरी भेटायला जातात. शिरखुरमा खातात-खिलवतात. शिरखुर्मासह गुलगुले म्हणजे गव्हाच्या पिठाची गोड भजी, तिखट भजी, पुलाव, बिर्याणी, कोरमा, सुक्का, आखनी असे मांसाहारी पदार्थांचे चविष्ट मेनू या दिवशी असतात. पदार्थ करण्याच्या पद्धतीत थोडाफार फरक असेल; पण बाकी साम्य असते.

चंद्र दिसला तरच दुसऱ्या दिवशी ईद होते. कधी एखाद्या भागातून चंद्र दिसतो, तर कधी दिसत नाही. त्यामुळे ईद कधी कधी मागे पुढे होते. दुसऱ्या दिवशी बाशी ईद असते. म्हणजे राहिलेले नातलग, पाहुणे, मित्रपरिचितांना भेटणे वा घरी बोलावून शिरखुर्म्याचा आस्वाद घेणे. कुठेतरी फिरायला जाऊन श्रमपरिहार करणे. कारण महिनाभरची दैनंदिनी फारच व्यस्त असते. थोडी उसंत मिळते ती या दिवशी.

## बकरी ईद - (ईद-उल्-अजहा)

हा मुसलमानांचा आणखी एक महत्त्वाचा सण आहे. जो साऱ्या जगातील मुस्लीम साजरा करतात. इस्लामिक मान्यतेनुसार या दिवशी पैगंबर इब्राहीम साहेब अल्लाहच्या आदेशानुसार आपले पुत्र मा. इस्माईल याची कुर्बानी देण्यासाठी तयार झाले होते. त्यांचा विश्वास आणि बलिदान पाहून अल्लाहने त्यांच्या पुत्राला जीवदान दिले. या घटनेचे स्मरण म्हणून दरवर्षी 'बकरी ईद' साजरी केली जाते.

बकरी ईदला 'कुर्बानी की ईद'ही म्हणतात. इस्लामिक कॅलेंडरनुसार जिलाहिज्ज महिन्यात कुर्बानीची ईद साजरी होते.

या दिवशी नमाज सकाळी जरा लवकर असते. घरातले सगळे सदस्य शूचिर्भूत होऊन नमाज पढतात. या दिवशीही सामूहिक नमाजाला महत्त्व असते. लोक ईदगाह, मस्जीदमध्ये नमाजाला जातात. महिला-मुली घरी नमाज पढतात. ईदच्या काही दिवस वा महिन्याआधी कुर्बानीसाठी

बकरा, बोकड खरेदी करून ठेवलेला असतो. ऐनवेळी जनावर खूप महाग होते, धावपळ होते म्हणून आधीच खरेदी केली जाते. कुर्बानीचा बकरा आजारी नसावा, खूर वा शिंग तुटलेले नसावे, बकरा जखमी, दुखापत झालेला नसावा. स्वकष्टार्जित पैशांतून खरेदी केलेला असावा. असे काही संकेत आहेत. ईदच्या दिवशी कुर्बानी करणाऱ्या खाटीकाला बोलावले जाते. रक्त, घाण निचरा होईल, अशी योग्य स्वच्छ जागा पाहून नमाजनंतर बकरा कुर्बान करतात. त्याआधी अल्लाहची कृतज्ञता व्यक्त करतात. कुर्बानी स्वीकारण्याची दुवा केली जाते. वरची साल वेगळी काढून ती एखाद्या मदरशाला अथवा ट्रस्टला दान केली जाते. ती विकून ते काही पैसे मिळवतात. कुर्बानीच्या मटनाचे तीन वाटे करायचे असतात. एक गोरगरिबांसाठी, दुसरा नातेवाईक आणि शेजाऱ्यांसाठी आणि तिसरा आपल्या कुटुंबासाठी. मटनाच्या वाट्यांची विल्हेवाट लावून संध्याकाळी घरासाठी स्वयंपाक होतो. बिर्याणी, पुलाव, अखणी, सुक्का, जिगरी, वजडी, भेजा, मुंडी, कबाब, खिमा, पाया असे विविध प्रकार बनवले जातात. लोक एकमेकांना गळाभेट देतात. ईद मुबारक म्हणत शुभेच्छा देतात. दोन्ही ईदला उटणे, सुवासिक साबण लावून आंघोळ नियत (गुस्ल) म्हणून आंघोळ होते. नंतर अत्तर, सुरमा लावतात.

## मोहरम

तिसरी महत्त्वाची ईद म्हणण्यापेक्षा प्रथा म्हणायला हवी, ती आहे मोहरम. मोहरम हा इस्लामिक इतिहासातील दु:खाचा, करबलाच्या शहीदांच्या स्मृतीचा दिवस आहे. पैगंबरांचे नातू माननीय इमाम हुसेन आणि त्यांच्या ७२ नातेवाईकांना यजीद म्हणजे जबरदस्तीने शासक झालेल्या खलीफाने करबलाच्या मैदानात घेरून हत्या केली तो हा दिवस. भारतात याचे स्मरण म्हणून हसन, हुसेन आणि इतर शहिदांचे प्रतीक म्हणून पंजे बसवण्याची प्रथा आहे. ज्याला 'सवारी बसवणे' असेही म्हणतात. नऊ दिवस पंजे बसवून शेरा, लोबान, फातेहा होतात. भाजी, रोटी वा शक्य असेल त्या पदार्थांचा नेवैद्य चढवतात. आसपासचे भाविक शेरा, लोबान, उद, नैवेद्याचे ताट घेऊन येतात. नवव्या दिवशी रात्री पंजाच्या मकानसमोर

खड्डा करून जाळ करतात. त्याला 'अलावा' म्हणतात आणि पंजे हातात धरून काही भाविक अलावात आगीवर चालतात. दहाव्या दिवशी गावातल्या, शहरातल्या नदी, तलाव, विहिरीपाशी मिरवणुकीने पंजे घेऊन जातात. निरोपाचे फतिहा होतात आणि पंजे/सवाऱ्यांचे विसर्जन होते.

**मातम करणे** म्हणजे दु:ख, शोक करणे. शिया धर्मिय करबलाच्या दिवशी रात्री काळे पोषाख घालून मिरवणुकीने मातम करतात. 'या हसन या हुसेन' म्हणून छाती बडवतात. दु:ख व्यक्त करतात. याला 'मातम' म्हणतात.

जिथे या सर्व पंजे/सवाऱ्या, त्यांचे साहित्य ठेवतात, त्याला 'कोटला' म्हणतात. नगर, औरंगाबाद, सांगली, मिरज येथील मोहरम, जुलूस पाहण्यासारखा असतो. याचवेळी फकीर बनवणे, वाघ बनवणे, मजनू बनून खेळ करणे आणखीही काही प्रथा, परंपरा हिंदू-मुस्लीम दोन्ही समाजाचे लोक भक्तिभावाने करतात.

मोहरमची आणखी एक सर्व परिचित प्रथा म्हणजे ताजिया बसवणे. तेराव्या शतकाच्या शेवटी ताजिया बसविण्याची प्रथा भारतात सुरू झाली. तैमुरलंग हा मोगल बादशहा दरवर्षी मोहरमला मातम (शोक) मनवण्यासाठी इराकला करबलाच्या मैदानावर भारतातून जात असे. आयुष्याच्या शेवटच्या वर्षात आजारपणामुळे त्याला जाता आले नाही, तेव्हा त्याने करबलात शहीद झालेल्या हजरत इमाम हुसेनच्या कबरीची प्रतिकृती बनवण्याचे आदेश दिले. जेणेकरून त्यांच्या यादमध्ये इथेच त्यांना स्मरून नमन करता येईल. कारागिरांनी कल्पकतेने प्रतिकृती बनवल्या. त्या त्याला आवडल्याने तीन ते चार वर्षे अशा प्रतिकृती बनवून भारतातच मोहरम मनवला. पुढे कझागीस्तान येथे त्याचा मृत्यू झाला. भारतात मात्र मोहरमचा ताजिया बनवून बसवण्याची प्रथाच पडली जी आजही सुरू आहे. ताजियाचेही मोहरम दिवशी विसर्जन होते.

तिसऱ्या दिवशी जियारत होते. म्हणजे दुखवट्याचा तिसरा, नववा, चाळीसावा दिवस घालतात. या दिवसांत आनंदाचे कोणतेच कार्य केले जात नाही. काही ठिकाणी तीन ते चाळीस दिवसांचा गम म्हणजे दुखवटा पाळतात. याला 'सफरका महिना' म्हणतात. सफरका महिना दु:खाचा

महिना म्हणून पाळतात. गावात, शहरात ज्यारतला म्हणजे तिसऱ्या दिवशी सामूहिक भोजन होते. या दिवशी मांसाहारी स्वयंपाक होतो. करबलाच्या दिवशी खिचडा आणि शरबत करतात. रोट बनवतात. खिचडा म्हणजे तांदूळ, मटण, सर्व डाळी, कडधान्ये, फळभाज्या एकत्र शिजवतात. गावागावातील परंपरागत समजानुसार थोडाफार फरक होतो; पण संकल्पना एकसारखीच असते. हिंदू-मुस्लीम दोन्ही समाजाचे श्रद्धाळू या विधीत सहभागी होतात.

### मोहंमद पैगंबर जयंती

म्हणजे पैगंबरांचा जन्मदिन, ज्याला 'ईद-ए-मिलाद' असेही म्हणतात. इस्लामिक कॅलेंडरनुसार तिसरा महिना म्हणजे रबीलावल महिन्याच्या १२ तारखेला ही ईद साजरी होते. इ. स. ५७१ला मक्का शहरात पैगंबरांचा जन्म झाला होता. याच्या प्रीत्यर्थ दरवर्षी ही ईद-सण साजरा करतात. या दिवशी जुलूस म्हणजे मिरवणूक काढतात, प्रार्थना होते, कुराण पठण होते. दानधर्म केला जातो. पैगंबरांची शिकवण, उपदेश लोकांना सांगतात. घरात खीर-पुरी आणि मांसाहारी, शाकाहारी स्वयंपाक करतात.

### ग्यारवी शरीफ

सुन्नी पंथाचे लोक दरवर्षी रबीलावर महिन्याच्या अकरा तारखेला आणि त्यानंतरचा महिनाभर ही प्रथा पर्वणी साजरी करतात. महान उपदेशक सुफी संत आणि पैगंबरांचे नातेवाईक असलेले माननीय शेख अब्दुल कादर जिलानी ऊर्फ गौसे आजम ऊर्फ गौसपाक ऊर्फ बडे पीरच्या स्मृतीप्रीत्यर्थ हा सण करतात. या दिवशी घरात गूळ-चपातीचा मलिदा करून अकरा दिवे लावतात. कोणी चांदीचे दिवे लावतात. मदरशातील मुले, आसपासची लहान मुले, फकीर, गरीब, अनाथ, विधवा, गरजूंना अन्नदान केले जाते. जिथे गौसपाकचा दर्गा असेल तिथे दर्ग्याचा संदल, उरूस, कव्वालीचा प्रोग्राम होतो. बगदादला यांची मजार/दर्गा आहे. तिथेही मोठा उत्सव होतो. मानवता, सत्य, प्रामाणिकपणा आणि अल्लाह व पैगंबरांवर विश्वासाची त्यांनी शिकवण दिली आहे. मात्र ज्यांना कुटुंबात ग्यारवीहचे चिराग करण्याची प्रथा आहे, मन्नत आहे तेच करतात. सरसकट मुसलमान ही ईद साजरी

करतात, असे नाही.

## रज्जब के कुंडे

सुफी संतांच्या स्मरणार्थ हे फातेहा होतात. ज्यांच्या घरात या फातेहा करण्याची परंपरा आहे तेच फातिहा करतात. या सणाला घरची स्वच्छता आणि पाकिजगीला विशेष महत्त्व आहे. या दिवशी खीर, पुरी, कानोले, करंज्या आणि शाकाहारी स्वयंपाक करून मातीच्या कुंड्यात-भांड्यात खीर, पुरी, कानोले इ. ठेवून फातिहा करतात. नातेवाईक, आसपासच्या लोकांना जेवायला बोलावतात. सूर्यास्तापूर्वी जेवणे उरकली जातात.

## बडोकी ईद / शाबानकी ईद

रमजान महिन्याच्या अगोदरचा महिना शाबान. या महिन्यात एक मोठी रात्र असते. शाबानच्या १५ तारखेला शब-ए-बारात ईद-प्रथा साजरी होते. शब म्हणजे रात्र आणि बारात म्हणजे मुक्त होणे. या दिवसाला मुस्लीम समाजात खूप महत्त्व आहे. रात्रभर जागून मुसलमान नमाज पढतात, अल्लाहचे नामस्मरण, जिक्र करतात. अल्लाहजवळ आपल्या गुन्ह्याची माफी मागतात. पुण्याईने जगण्याची सदा इबादत करत राहण्याची आणि मृत्यूनंतर गुन्ह्यांची माफी होऊन जन्नतमध्ये दाखिला-प्रवेश मिळावा म्हणून दुवा करतात.

शिवाय जे पूर्वज, कुटुंबीय, मित्रपरिचितांचे निधन झाले आहे त्यांचेही या रात्री स्मरण करतात. म्हणून या ईदला 'बडोंकी ईद / बुजुर्गोंकी ईद'ही म्हणतात. या रात्री कब्रस्तानात स्वच्छता करून सजवले जाते. रोशनाई करतात. काही लोक कब्रला पांढरा चुना लावतात. इशाच्या नमाजानंतर पुरुष, लहान मुले कब्रस्तानात जातात. जाताना अत्तर, उदबत्ती, फुले, शेरा नेतात. कबरींवर फुले वाहून अत्तर, उदबत्ती लावतात. दिवंगतांचे स्मरण करून अल्लाह जवळ सर्व मृतांच्या गुन्ह्याची माफी देण्याची, जन्नतमध्ये जागा देण्याची प्रार्थना करतात. या दिवशी कब्रस्तान सारखी जागाही अगदी पाहण्यासारखी सुंदर, असिम शांत गंभीर भासते.

## शब-ए-मेराज

हा अरबी शब्द आहे. शब म्हणजे रात्र आणि मेराज म्हणजे आकाश.

उर्दूच्या रजब महिन्याच्या २७ तारखेला शब-ए-मेराज साजरी करतात. इस्लामिक मान्यतेनुसार या रात्री पैगंबरांची आणि अल्लाहची भेट झाली होती असे म्हणतात. या रात्री पैगंबर साहेब बुर्राक नावाच्या दैवी जनावरावर बसून सात स्वर्ग पार करून अल्लाहला भेटले होते, अशी मान्यता आहे. या रात्री रात्रभर नमाज पठण, नामस्मरण, दानधर्म करून अल्लाहजवळ आपल्या गुन्ह्यांची माफी मागतात. ही एक पवित्र रात्र असते.

## सत्तावीस शब : शब-ए-कद्र

रमजान महिन्यातील सव्वीसावी रात्र आणि सत्तावीसाव्या रोजाला मुसलमानांत विशेष मान आणि आदर आहे. याला 'जागने की रात'ही म्हणतात. मस्जिदीला सजवतात. सत्तावीसाव्या रोजाच्या इफ्तारी नंतर रात्रीची इशा नमाज होते आणि शब-ए-कद्रची नमाज अदा होते. या रात्रीला अनेक अर्थांनी विशेष महत्त्व आहे. ज्या ज्या मस्जीदमध्ये तरावीहची नमाज होते त्या आणि वर्षभर मस्जीदमध्ये नमाज पढवणारे इमाम, अजान देणारे बांगी, स्वच्छताकर्मी, व्यवस्थापन कर्मचारी, कुराण हाफिज या सर्वांना मस्जीद कमिटी तर्फे मानधन, इनाम देऊन सत्कार सम्मान करतात. पहाटेची नमाज झाल्यावर कब्रस्तानात जाऊन आपले दिवंगत नातेवाईक, मित्रपरिचित आणि पूर्वजांचे स्मरण करून त्यांच्या मोक्षाकरिता, जन्नत प्रवेशाकरिता अल्लाहजवळ दुवा केली जाते. या रात्री केलेली दुवा अल्लाह स्वीकारतो असा समज आहे. दुसऱ्या दिवशी गहू, पैसे, लुंगी वा कपडे दान दिले जातात.

## उर्स शरीफ

म्हणजेच उरूस होय. ज्याप्रमाणे गावच्या ग्रामदैवताची वा गावदेवीची दरवर्षी जत्रा भरते, तद्वत दरवर्षी पिराचा, वलिचा उरूस साजरा करतात. उरूस दोन-तीन दिवस चालतो. साधारणपणे संदल, शेरा आणि लंगर असे कार्यक्रम असतात. दर्गा आणि आसपासचा परिसर रंगरंगोटी करून, स्वच्छता व रोशनाई करतात. संदलच्या दिवशी दर्ग्यातील मजार सुवासिक जल, गुलाबपाणी, अत्तर इत्यादी घालून कुराणातील आयती म्हणत अभिषेक करतात. चंदन पावडरचा लेप लावतात. नवीन गलीफ म्हणजे वरची चादर घालतात. दुसऱ्या दिवशी गावचा ज्यांना मान असेल

त्या कुटुंबाकडून अथवा ग्रामपंचायतीकडून शेरा, लोबान, अत्तर, फुले, उदबत्ती वाजत गाजत मिरवणुकीने आणतात. दर्ग्याचे मुजावर ट्रस्टी आणि इतर मान्यवर व्यक्ती मजारीवर शेरा, फुले चढवतात. कुराणातील आयती सुरे उच्चारणात दुवा होते. नैवेद्य चढवतात. धूप, लोबान, अत्तर, बत्ती, दिवा (चिराग) लावतात, नगारे वाजवतात.

दरवर्षाच्या शिरस्त्याप्रमाणे त्या पिराला मानणारे, गावचे लोक, बाहेरगावी गेलेले कुटुंब, सासरी गेलेल्या लेकी उरूसाला आवर्जून येतात. जी परंपरा असेल त्यानुसार मलिदा, मिठा चावल, बुंदी, कोंबडा, बकरा कापून कंदोरीचा स्वयंपाक करतात. नातेवाईक, परिचित मित्रांना दर्गा परिसरातच जेवायला बोलावतात. रात्री कुठे कुठे कव्वाली वा इतर मनोरंजनाचे वा प्रबोधनाचे कार्यक्रम होतात. तिसऱ्या दिवशी कंदोरी होते. आम दावत म्हणजे लंगर - गावजेवण होते. अनेक दर्ग्यांच्या प्रथापरंपरांत थोडाफार फरक असेल; पण साधारण स्वरूप असे असते. तसेही गावची जत्रा वा उरूस न जगलेला माणूस महाराष्ट्रात सापडणे कठीण आहे.

काही ठिकाणी उरूसात अंगावर, कानात, जिभेवर शरीराच्या कातडीत 'जरब' लावायची प्रथा आहे. म्हणजे धातूच्या पातळ बारीक सळ्या टोचतात. हा श्रद्धेचा भाग आहे.

■ □ ■

# निकाह, तलाक आणि हलाला

## शादी-निकाह

मुलगा किंवा मुलगी वयात आल्यानंतर योग्य स्थळ संशोधन सुरू होते. स्थळ नातेवाईकांत, मित्रपरिचितांत आणि ओळखीतून शोधतात. एकमेकांची पसंती, विचारपूस होऊन समाधान झाल्यावर 'बैठक' घेतात. ज्यात दोन्हीकडचे नातेवाईक, पाहुणे असतात. लग्न ठिकाण, येणारे पाहुणे, घेणे-देणे, दान-दहेज, नजराणे, आहेर, मेहर, लग्नातील मेनू, साखरपुडा कसा, कधी, कुठे करायचा या सर्व विषयांबाबत बोलणी करून ऐपतीनुसार तडजोड करून पुढचे कार्यक्रम ठरतात.

**मंगनी - साखरपुडा -** यात मेहंदी आणि फुलपानची रस्म असते. दोन दिवसांचे कार्यक्रम होतात. रस्मच्या दिवशी नवरी आणि नवऱ्या मुलाला हार-फुले नेसवतात. तोंड गोड करतात. ऐपत असणारे सोन्याच्या अंगठ्या वा एखादा दागिना घालतात. येणाऱ्या पाहुण्यांना पान-सुपारी आणि जिलेबी वाटतात. ठरल्यानुसार चहापाणी, अल्पोपहार किंवा जेवणाची दावत होते. रस्म करताना गळ्याला संदल म्हणजे चंदनपावडर पाण्यात कालवून लावतात. रस्म सवाशिणी करतात.

**निकाह -** म्हणजेच शादीच्या दिवसाआधी दोन-तीन दिवसांपूर्वीच रस्मरिवाज सुरू होतात. ज्यात आधी कुराणखानी म्हणजे कुराण पठण करून अल्लाहाचा शुक्रिया करतात. काही लोक घरच्या पिराला मानपान देतात, जेवण बनवतात. छोटे-बडोंका म्हणजे पूर्वज-पितरांना शांत करण्यासाठी एखाद्या गरिबाला नवे कपडे, पैसे, जेवण देतात. पुढे पहेली रस्म मेहंदीची. या संध्याकाळी छोटेखानी रस्म करून नवरीला/नवऱ्याला

सवाष्ण, कुमारीका हातात पान ठेवून मेहंदी लावतात. नंतर दोन्ही हातापायांवर नक्षीदार मेहंदी काढतात. नवरामुलगा हातावर एखादा ठिपका वा आग्रहाखातर छोटीशी नक्षी काढून घेतो. मग घरातील लहानमोठ्या महिला पारंपरिक गाणी म्हणत, ढोल वाजवत मेहंदी लावतात.

दुसऱ्या दिवशी पहाटे चोर हल्दी होते. म्हणजे वधू-वराच्या नकळत ते झोपेत असताना बहिणीने हळदीची पाच बोटे त्यांच्या अंगाला लावायची. संध्याकाळी सहकुटुंब हळदीचा कार्यक्रम होतो. पुन्हा छोटी फुलपानाची रस्म होते. सवाष्णी, कुमारिका डोके, खांदा, हात, पायांवर हळद लावून रस्म करतात. गोड पदार्थ भरवतात. जवळच राहत असतील तर नवऱ्याची उष्टी हळद पाच-सात लोकं मिळून नवरीच्या घरी घेऊन जाऊन तिला रस्म करत हळद लावतात. मग सगळे एकमेकांना हळद लावण्याचा आनंद घेतात. हळदीच्या दिवशीच 'सुहागन खाना' म्हणजे  सवाष्ण महिलांना जेवू घालतात. सात, नऊ, अकरा, तेरा, पंधरा असे विषम आकड्यांत सवाष्ण महिलांमध्ये एक कुमारिका आणि एक विधवा महिला असते. नातेवाईकांना पोषाख, आहेर, मानपान देतात. हिरवा चुडा/बांगड्या भरण्याचा कार्यक्रम होतो. शादीच्या प्रत्येक रस्मला सवाष्ण महिला दाताला मिसी म्हणजे दातवण लावतात आणि नवरीलाही आणि नवऱ्यालाही लावायला देतात.

रस्म करताना तांदूळ पिवळे करून गाणी म्हणत, स्त्रिया चौरंग भरतात. म्हणजे तांदळाने चौरंगावर नक्षी काढतात. पान, सुपारी, नाडा, दातवण, चहापान असा भरगच्च माहौल असतो लग्नघरात. सोबतच उखाण्यात नाव घेणे, घास भरवणे, हँसीमजाक एकीकडे सुरू असतो. तर दुसरीकडे दुसऱ्या दिवशीच्या निकाहची तयारी सुरू असते. नातेवाईकांनी घर गजबजते. दारातील मांडवात पुरुषमंडळींची उठबस सुरू असते. मांडव टाकताना एका खांबाला लाल कापडात ज्याला 'मद्रेका कपडा' म्हणतात, त्यात कोणी पानसुपारी, तांदूळ, एखादे नाणे टाकून नाड्याने पोटली बांधतात, तर काही ठिकाणी पानसुपारी, लिंबू, नारळ बांधतात.

जेवायला येणाऱ्या सवाष्ण महिला, घरातील इतर महिला मिळून

नवरदेवासाठी कट्यार लाल कापडात गुंडाळून नाड्याने बांधून हातात देतात. दोन्ही घरी नारळ, पानसुपारी, लिंबूचे कमरबंद आणि हातकंगण तयार करून नवरा/नवरीच्या कंबरेवर, हातावर, दंडावर बांधतात. नजर लागू नये, बाह्य बाधा होऊ नये म्हणून हे बांधतात. दारावर, घराच्या भिंतीवर मेंदीने शेऱ्याच्या लड्या काढतात. कोणी 'शादी मुबारक' लिहितात. लग्नाच्या दोन-चार दिवसांपूर्वीच तेलपुऱ्या, कानोले, कडाकणे (कडक पुऱ्या) करून ठेवतात. रूकसत म्हणजे बिदाईच्या वेळी नवरीमुलीसोबत टोपली भरून लाल कापडाने झाकून बुट्टी पाठवतात. नवरदेवाच्या घरी केलेले हे पदार्थ त्याच बुट्टीत भरून लाल कापडाने बांधून नवरी जेव्हा पहिल्यांदा परत माहेरी येते तेव्हा तिच्यासोबत पाठवतात.

तिसरा दिवस निकाहचा. या दिवशी पहाटे नवरानवरीला तेल उतरवण्याची रस्म होते. तेव्हा लाल रंगाच्या ओढणीची चार टोके धरून नवरा-नवरीच्या डोक्यावर छत धरतात. चारी टोकांना आणि छतावर दोन-दोन तेलपुऱ्या (कडाकण्या) ज्याला 'सुवाल्या' म्हणतात ते ठेवतात. कडब्याच्या काडीच्या टोकाला नाड्याने दोन पुऱ्या बांधून नागवेलीची पाने म्हणजे खायची पाने बांधून तेलकाडी तयार करतात. आदल्या दिवशीचा छोटा शेरा, हार पुन्हा घालतात. गाणी म्हणत डोके, खांदे, गुडघे, पायांवरून टेकवत तेलकाडीने तेल उतरवतात. प्रत्येक रस्मच्या वेळी कुमारीका मुलगी नवरा-नवरीचे कान धरून उभी राहते. हळदीच्या वेळेपासूनच नवरीच्या घरातले नातेवाईक मुलीच्या बिदाईच्या विचाराने भावूक होऊन अश्रू टिपायला सुरुवात झालेली असते. एकीकडे विरहाचे दु:ख तर दुसरीकडे नवीन आयुष्याच्या चैतन्याच्या फुलझड्या फुलत असतात.

तेल उतरवण्याच्या विधीनंतर नवरानवरीची आंघोळीची रस्म असते. इथेही सवाष्णीचा मान असतो. पाण्यात सुगंधी द्रव्ये जसे अत्तर, गुलाबपाणी घालून सवाष्ण बायका नवरीला, तर पाच-सात पुरुषमंडळी नवरदेवाला एकेक तांब्या पाणी डोके, खांद्यावरून टाकतात याला गुस्ल म्हणतात.

गुस्ल झाल्यावर नवरदेवाला नवा टॉवेल, लुंगी, अंतरवस्त्र देतात. हे मुलीकडच्यांनी दिलेले असते, तर कधी स्वत:चेही असते. नंतर लोबान

धुँवा देतात. नवे कपडे परिधान केल्यावर नवरानवरीला अल्लाहला धन्यवाद देण्यासाठी 'शुक्राना नमाज' पढायला लावली जाते. त्यानंतर नवरीचा श्रृंगार, केशरचना, निकाहचे कपडे नेसवून सवाष्ण महिला पुन्हा रस्म करून, तोंड गोड करून शेरा बांधतात. नवरदेवाला पाच वा सात पुरुष शेरा बांधतात. त्याआधी घरातल्या महिला रस्म करून म्हणजे गळ्याला संदलहात (कालवलेली चंदन पावडर) लावून तोंड गोड करतात.

लग्नाचा पोशाख नवरानवरीच्या आवडीनुसार घेतात. नवरीला नवरदेवाकडून पाच जोड कपडे, ऐपतीनुसार दागिने, चप्पल, पायात पैंजण आणि साजसामान, नजराणा देतात. नवरदेवाला पूर्ण पोशाख, पोशाखासाठी रक्कम, रूमाल, टोपी, ठरल्यानुसार सोन्याचे ऐवज देतात. दहेजमध्ये ऐपतीनुसार गृहसाहित्य, शोभेच्या वस्तू देतात. दोन्हीकडच्या विहिणींचा आहेर, काही महत्त्वाच्या किंवा बुजूर्गांचा कपडे देऊन आहेर होतो. हल्ली खूपशा प्रथा मागे पडत आहेत. महागाई, शिक्षण, आधुनिकीकरण, वेळेच्या अभावामुळे लग्नसोहळ्याचे दिवस, रस्म, मानपान, दानदहेज देणे यात कपात झाली आहे. 'तुमचे खर्च-मानपान तुम्ही, आमचे खर्च-मानपान आम्ही' असाही एक प्रवाह रूजत आहे. हुंडा ही प्रथा जवळपास नाही; पण दहेज बाबत काही ठिकाणी आग्रह पाहायला मिळतो.

निकाहच्यावेळी स्थानिक मस्जिदीचे जबाबदार मस्जिदीची नोंदवही घेऊन येतात. त्यांना आधीच निमंत्रण दिलेले असते. निकाह काझी पढवतो. त्यावेळी तीन व्यक्ती साक्षीदार लागतात. आधी मुलीकडे जाऊन तिची निकाहसाठी परवानगी, कबुलियत घेऊन रजिस्टरवर सही होते. मग सगळी पुरुष मंडळी मंडपात बसून बारातीसमोर निकाह पढतात आणि दुल्ह्याला 'कबुल है ?' असे विचारतात. त्याने 'कबुल है, हाँ मैने कुबुल किया, मुझे महेर और दुल्हन कुबुल है' असे तीन वेळा म्हणल्यावर दुवा पढवला जातो. ज्यात नवदाम्पत्याच्या पुढील आयुष्यासाठी सद्वर्तन, विवेकी जीवनासाठी तसेच सगळ्या मानवांसाठी अल्लाहजवळ दुवा मागतात. काजीच्या मागे सगळे 'आमीन' म्हणजे 'असेच होवो' म्हणतात आणि निकाह संपन्न होतो.

**मेहेर म्हणजे काय ? -** नवऱ्या मुलीचा नवऱ्या मुलासोबत निकाह लावून देताना तिला दिली जाणारी ठराविक रक्कम. जी दोन्हीकडच्या नातेवाईकांनी चर्चा करून ठरवलेली असते.

निकाह पूर्ण झाल्यावर उपस्थितांना खजूर, खडीसाखर वाटतात. एकमेकांना बधाई देतात. बाराती भेट घेतात, भेटवस्तू देतात. निकाहसाठी दुल्हा दुल्हनला मेहेर म्हणजे एक विशिष्ट रक्कम द्यायचे मान्य करतो. जी आधीच बैठकीत दोन्ही पक्षांनी ठरवलेली असते. ही रक्कम कधी तिथेच रोख देतात, तर कधी उधार ठेवली जाते; पण ती द्यायचीच असते. मंडपात दहेज सजवून ठेवतात. बिदाईच्या वेळी दुल्हनसह सर्व दहेज सासरी पाठवतात. जेवणावळ होते. या दिवशी हँसी मजाक, छेडखानीच्या अनेक प्रथा आहेत. जसे मुसळ आडवे धरून नवरदेवाला अडवणे, बूट, कट्यार लपवणे, दारात थांबून मुलाच्या बहिणीने 'पहिली मुलगी माझ्या मुलाला दे' म्हणून मागणे घालणे, नाव घेणे, आरास खेळणे, परातीतल्या हळदीच्या पाण्यात दोघांनी अंगठी शोधणे, दुल्ह्याने दुल्हनची वेणी सोडवणे, आरशात एकमेकांना तोंड दाखवणे इत्यादी प्रथांचा आनंद घेत निकाह होतो. मुलगी पराई होते.

आता शेवटी दुल्हनची बिदाई होते. एकीकडे नवऱ्याकडच्या बरातीची परतीची घाई, दहेजची बांधाबांध होत असते, तर दुसरीकडे अत्यंत भावूक करणारी रस्म 'बिदाई' सुरू असते. कुटुंबातील, नात्यातील एकेक सदस्य दुल्हनजवळ येऊन तिचा हात हातात घेऊन सासरी चांगले वागण्यासंबंधी उपदेश करून जातो. या प्रसंगी सगळ्यांच्या डोळ्यांत अश्रू असतात. नंतर दुल्हा दुल्हनला उचलून घेऊन बाहेर जातो. आलेली वरात नवरीला घेऊन रवाना होते. नवरीसोबत माहेरची एखादी प्रौढ स्त्री पाठराखीण म्हणून सोबत जाते.

सासरी दोघांवरून घास आणि पाणी उतरून दृष्ट काढली जाते. तिथेही परत काही लोक रास खेळवतात. रात्री दोघांना एकांत देतात. ही नवदाम्पत्याची मिलनरात असते. दुसऱ्या गावी किंवा लांब असेल तर तिसऱ्या दिवशी 'वलिमा' करतात. म्हणजे नवरीकडच्या वरातींना जेवणाचा

समारोह असतो. ज्याला आता 'रिसेप्शन' म्हणतात. या दिवशी नवरीला सकाळीच माहेरचे लोक येऊन घेऊन जातात. येताना कोणी मिठाई, फळे आणतात, तर काही ठिकाणी सर्वांसाठी न्याहरी बांधून आणतात. सगळ्यांना खाऊ घालतात. दूरचा प्रवास असेल तर ही प्रथा होत नाही. मात्र वालिमाला जेवायला सगळे येतात. येताना पुन्हा दोघांसाठी हार, गजरे, तुरा आणि कपडे आणून रस्म होते. इथे शादीचा सोहळा संपन्न होतो.

पुढे पाच जुमागी होते. म्हणजे पाच शुक्रवारी नवरा-नवरी आणि जवळच्या दोन-तीन नातेवाईकांना दोन्हीकडचे नातलग जेवायची दावत करतात. इथेही फुलपान रस्म होते. कोणी कपडे करतात. उद्देश नातलगांची ओळख व्हावी. पुढे त्यांना जोडीने पिराच्या दर्शनाला घेऊन जातात. कोणी बाहेर फिरायला जातात. तिसऱ्या-चौथ्या दिवशी नवरीला स्वयंपाकघरात एखादा गोड पदार्थ किंवा भाजी-भाकरी करायला लावतात. अशा तऱ्हेने नव्याची नव्हाळी संपल्यानंतर दोघांचा संसार सुरू होतो.

पहिली ईद, पहिला मोहरम, पहिले बाळंतपण माहेरीच होते. लग्नाच्या आधी नवरा-नवरीला नातेवाईक जेवणाचे निमंत्रण देतात म्हणजे दावत करतात. तेव्हा मांसाहारी जेवण, गोड जेवण बनवले जाते. नवरी मुलीची गोद (ओटी) भरतात. नवऱ्यामुलाला संदलहात लावून रूमाल आणि नजराणा (पैसे) देतात.

**इतर खुलासे** – निकाहवेळी ठरलेली मेहेरची रक्कम पत्नीला द्यावीच लागते. त्या पैशांवर फक्त तिचा अधिकार असतो. ते तिने तिच्या मनाप्रमाणे खर्च करायचे असतात.

रस्म करताना पैसे-नाणी ओवाळून संदल तबकात टाकतात, ते नवरा/नवरीची बहीण, वहिनी घेतात. पाठराखणीला गेलेल्या महिलेला कपडे करतात.

निकाहसाठी काझीला हदिया (दक्षिणा) आणि नोंद रजिस्टर ज्या मस्जीदचे असेल त्या मस्जीदलाही ठराविक रक्कम द्यावी लागते. ते कधी नवरीकडचे देतात, तर कधी दोन्ही पक्ष मिळून अर्धेअर्धे देतात.

शादी मुलीकडचे करून देतात. वलिमा-रिसेप्शन मुलाकडच्यांकडून

असते. रिवाजानुसार निकाहच्या तीन-चार दिवसांत वलिमा करावा, अशी मान्यता आहे.

कधी निकाह मांडवात करतात. कोणी मस्जीदमध्ये निकाह पढवून लग्नस्थळी येतात. कोणी जमातमध्ये करतात. म्हणजे धार्मिक उपदेश-प्रवचन करणाऱ्या मोठ्या मेळाव्यात, ज्याला 'इज्तेमा' म्हणतात, त्यात करतात. नवरा-नवरी एकमेकांपासून दूर असतील, येणे अशक्य असेल तर निकाह फोनवरही होतो.

इस्लामच्या संकेतानुसार वाजत गाजत, बँडबाजा लावून, आवाज करत वरात/मिरवणूक काढणे निषिद्ध आहे.

पूर्वी दुल्हन आतच असे. हल्ली स्टेजवर बसवून निकाह-रिसेप्शन होते.

वालिमानंतर दोघांचे शेरे, कमरबंद, बाजूबंद, कट्यारचे लिंबू, मांडवाला बांधलेली पोटली, ताईत सगळे एकत्र करून पाण्यात सोडतात. वर्दळ नसलेल्या जागी टाकतात.

इस्लामिक संकेतानुसार दुल्हनला गळ्यात लच्छा, मंगळसूत्र, जोडवी इत्यादी विवाहितेची प्रतीके नाहीत; पण महाराष्ट्रीयीन प्रथा-परंपरेचा भाग म्हणून लच्छा, जोडवी, पैंजण, हिरवा चूडा घालून दुल्हन सजवतात. या मुसलमान शादीच्या अविभाज्य प्रथा दिसतात.

पूर्वी दहेजमध्ये तांब्यापितळेची पाच, सात, नऊ, अकरा किंवा ऐपतीनुसार भांडी द्यावी लागत. हल्ली गरज, आवड, सोय आणि ऐपत पाहून देतात.

नवरीला कुराण, जांनमाज (नमाजाची चादर) द्यायलाच हवी, अशी अलिखित प्रथा आहे.

पूर्वी लग्नपत्रिका जिला 'रूक्का'ही म्हणतात, ते घरोघरी जाऊन देत. गरीब तांदूळ पिवळे करून चिमूटभर देऊनही निमंत्रण देत. हल्ली मोजक्या पत्रिका करतात. बाकी निमंत्रण फोनवर, व्हॉटसॲपवर देतात.

शादी झाल्यानंतर घरात शिल्लक राहिलेले कानोले, तेलपुऱ्या, कडाकण्या शेजारीपाजारी, नातेवाईकांना वाटतात.

या नंतर वेध लागतात ते बाळ येण्याचे......

**बाळंतपण –** महाराष्ट्रीयन प्रथापरंपरेनुसार पहिले बाळंतपण माहेरी होते. सातव्या महिन्यात मुलीला माहेरचे लोक जाऊन माहेरी आणतात. मुलगी आल्यानंतर पहिला समारोह होतो. याला 'सतवासा' (डोहाळे जेवण) म्हणतात. यात पुन्हा फुलपानाची रस्म सवाष्ण बायका करतात. तिला हिरव्या बांगड्या भरतात, हिरवी साडी, जावयाला पोषाख करतात. जेवणाची दावत करतात. पानसुपारी, तांदूळ, खोबरे, हळकुंड इत्यादी वस्तुंनी ओटी भरतात. दातांना मिस्सी लावतात. लेकीचे औषधपाणी, देखरेख, खाणेपिणे, काळजी घेणे व्यवस्थित होते. काही ठिकाणी तिला नजर लागू नये म्हणून हात व पायात काळा दोरा बांधतात.

बाळ जन्मल्यावर पहिल्या दिवशी घरातला एखादा पुरुष माणूस बाळाच्या कानात 'आजान' फुंकतो म्हणजे कानात आजान देतात. काहीजण पहिल्या दोन-चार दिवसांतच बाळाची सुंता (खत्ना) करवून घेतात. काहीजण फुलपान, नवे कपडे, दावत वगैरे करून हौसेने मोठा जश्न करून खत्ना (सुंता) करतात.

पंजेरी, डिंक लाडू, शेपा, मालिश अशी देखरेख करतात. तसेच बाळ-बाळंतिणीची काळजी घेतली जाते. सव्वा महिना पाळतात. या दिवसांत बाळंतीण नमाज वा कुराण पठण करत नाही. धार्मिक सोहळ्यात भाग घेत नाहीत. सहाव्या दिवशी पानसुपारी, गोडधोड करून 'छटी' करतात. सव्वा महिना झाल्या दिवशी पाच-सात सवाष्ण बायका बाळ-बाळंतिणीला आंघोळ-गुस्ल घालतात. नवे कपडे नेसवतात आणि बाळाची आई नमाज पढून अल्लाहचा शुक्रीया मानते. सोईनुसार 'छिल्ला' म्हणजे बारशाचा कार्यक्रम ठेवतात. पारंपरिक गाणी म्हणत, नावाचे उखाणे घेत, हसत खेळत बाळाला पाळण्यात घालतात. शक्यतो जुना पाळणा असावा असे म्हणतात. पाळण्यात चंदनाचे लाकूड कापडात गुंडाळून अदलाबदल करत, गाणी म्हणत खेळ होतो. बाळाचे नाव त्याच्या कानात पुकारण्याचा मान आत्याचा म्हणजे फुफ्फुचा असतो. तिलाही कपडे घेतात. बाळाच्या आईबाबांची शेजारी शेजारी बसवून रस्म होते. यावेळी हारफुले नसतात; पण आईच्या केसात

गजरा माळतात. नातेवाईक महिला चंदनहात लावून आहेर देतात. त्यात कपडे, दागिना, रोख पैसे, छोटी भांडी, बाळाला अंगठी, वाळा, पैंजण, चैन, खेळणी असे ऐपतीनुसार आहेर देतात. इतर लोक आईची ओटी भरतात. जेवणाची दावत होते आणि बाळ-बाळंतीण आपल्या घरी जातात. बारशाला आलेल्या पाहुण्यांना भिजवलेले हरभरे (घुगऱ्या), पानसुपारी, जिलेबी वाटतात. सकाळी खिर करतात. जवळच्या नातलगांना वाटतात. इतरवेळी बाळाला बघायला येणारे बाळाच्या हातात रोख पैसे देतात, ज्याला 'नजराणा' किंवा 'मुँहदिखाई' म्हणतात.

**तलाक पद्धती**

कुराणमध्ये स्पष्ट आदेश आहेत की, जर पतीपत्नीचे एकमेकांसोबत वैवाहिक जीवन जगणे अगदीच अशक्य असेल, सगळ्यांनी प्रयत्न करूनही समेट होत नसेल, तर एकमेकांचा उचित सन्मान राखत, दोषारोप, अपमान, नुकसान न करता वेगळे होऊन दुसरा योग्य जोडीदार निवडून पुन्हा निकाह करून आयुष्य उपभोगावे.

तलाकने संबंध विच्छेद करून वैवाहिक नाते संपुष्टात आणण्याच्या ज्या पद्धती सध्या प्रचलित आहेत त्याचे इथे थोडक्यात; पण महत्त्वाचे विवरण देत आहे. अधिक जाणून घेण्याची उत्सुकता असणाऱ्यांनी 'भारतीय मुस्लीम कायदे' हे पुस्तक वाचावे.

**१) तलाक-ए-अहसन -** अहसन हा अरबी शब्द आहे. ज्याचा अर्थ आहे 'उत्तम.' तलाकची प्रक्रिया समाजण्याआधी 'इद्दत' म्हणजे काय हे पाहायला हवे.

इद्दत म्हणजे पतीने पत्नीला तलाक दिल्यानंतरच्या तीन महिने दहा दिवसांच्या काळाला 'इद्दतचा काळ' म्हणतात.

तलाक अहसन देण्याची नियत असल्यावर पतीने तलाक देत असल्याचे स्पष्टपणे व्यक्त करायला हवे. तसेच मासिकपाळी सुरू असताना पत्नीला तलाक देऊ नये. ह्या तलाकचे वैशिष्ट्य असे की, पतीला पत्नीला दिलेल्या तलाकमुळे पश्चात्ताप होत असेल आणि चूक सुधारण्याची संधी हवी असेल तर इद्दत कालावधीत असा तलाक परत घेता येतो. मात्र इद्दत

कालावधी नंतर तलाक परत घेता येत नाही. हे नियम पत्नी-पती दोघांवर बंधनकारक आहेत.

**२) तलाक-उल-हसन -** हसन या शब्दाचा अरबीत अर्थ होतो 'चांगला'. या पद्धतीत तलाक द्यावयाचा असल्यास पत्नीच्या मासिक पाळीनंतर एक, ३० दिवसांच्या अंतराने दुसरा, परत ३० दिवसांच्या अंतराने तिसरा असे तीनवेळा तीन महिन्यांत एकेक तलाक द्यावयाचा असतो. या काळात पत्नीशी शारीरिक संबंध ठेवता येत नाही. तिसऱ्यावेळी तलाक दिल्यावरच तलाक पूर्ण बंधनकारक होतो. तो परत घेता येत नाही. मात्र एक-दोन तलाकच्या दरम्यान गैरसमज दूर झाले, ते दोघे परत एकत्र नांदू लागले तर तिसरा तलाक देत नाही.

**३) तलाक-ए-बिद्दत -** एकावेळी एका बैठकीत 'तलाक' शब्द तीन वेळा उच्चारून पत्नीला तलाक द्यायची ही पद्धत आहे. यात कुराणातील मार्गदर्शक तत्त्वे वापरली जात नाहीत. स्त्री मासिकपाळीत आहे, नाही याचा विचार होत नाही. याला धार्मिक शास्त्रीय/कुराणाचा आधार नाही. वरील दोन्ही पद्धतीत दीर्घ कालावधी व क्लिष्ट तरतुदींना दूर ठेवण्यासाठी भारतात ही तिहेरी तलाक पद्धती वापरली जात होती. अनेक संस्था, संघटना, पीडित-बळी, स्त्रीवादी कार्यकर्त्यांच्या अनेक वर्षांच्या संघर्षानंतर ऑगस्ट २०१७ रोजी या तलाकवर बंदी आली. मात्र त्यातील तरतुदींवर वादविवाद आहेत. या बंदीमुळे काही अंशी वचक बसलेला दिसतो. मुळापासून ही पद्धत रद्द ठरवण्यासाठी कायद्यातील तरतुदींवर आणखी काम होणे गरजेचे आहे. अन्यथा ही बंदी म्हणजे केवळ दुषित पूर्वग्रहयुक्त केवळ दिखावा वाटतो.

४) इला, जाहीर, खुला, मुबारत नामा, लिआन, निकाह-ए-फास्क आणि दि डिझोल्युशन ऑफ मुस्लीम मॅरेज ॲक्ट १९३९ याही वैवाहिक संबंध संपुष्टात आणण्याच्या काही पद्धती आहेत. यात विविध तरतुदी आणि कारणांचा समावेश आहे.

### हलाला

हा अतिशय संवेदेनशील मुद्दा आहे. हलाला पद्धतीबाबत अनेक तर्क

कुतर्क आहेत. त्याकाळची परिस्थिती आणि त्यावेळी वापरली गेलेली ही पद्धत याचे वास्तवदर्शी स्पष्ट रूप उपलब्ध नाही. याबाबत जाणकार आणि आलिम यांच्यात अनेक सही-गलत वादविवाद आहेत. भारतात या पद्धतीचा वापर अगदीच मोजक्या जागी होत असेल आणि अगदी मोजक्या लोकांची याला सहमती आणि पाठिंबा असावा.

या पद्धतीनुसार एखाद्या स्त्रीला पतीने तलाक दिला असेल आणि तो परत तिच्या सोबत वैवाहिक आयुष्य व्यतित करू इच्छित असेल, तर त्या स्त्रीचा दुसऱ्या पुरुषाशी निकाह व्हावा. त्याने तिच्याशी शय्यासोबत करावी आणि ती रजस्वला वा गरोदर नाही हे पाहून तिला स्वतःच्या मर्जीने तलाक द्यावा. त्या स्त्रीचा या तलाकनंतर तीन महिने दहा दिवसांनी पुन्हा पहिल्या पतीशी निकाह होऊन दोघे परत वैवाहिक आयुष्य व्यतीत करू शकतात.

■ □ ■

# कफन-दफनविधी

मुस्लीम व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याचा लवकरात लवकर दफनविधी करावा अशी मान्यता आहे. मुस्लीम व्यक्तीचे मृत्यूनंतर दफनच केले जाते. अंत्यविधीची अन्य कोणतीही पद्धत अमान्य आहे. व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याचा दफनविधी खूप श्रद्धेने, पाकिजगीने आणि धार्मिकतेने होतो. हदिसच्या मार्गदर्शक सुन्नत मुद्यांनुसार सगळे विधी होतात. व्यक्तीचा मृत्यू झाल्यावर त्याला दिवसाच्या कोणत्या नमाजाच्या वेळी खाक-ए-सुपूर्द करायचे म्हणजे दफन करायचे हे त्या व्यक्तीचे जवळचे नातेवाईकांनी ठरवल्यावर इतर लोक पुढच्या तयारीला लागतात. सर्वात आधी कब्रस्तानमध्ये कळवले जाते आणि तिथले व्यवस्थापन निर्देश करेल त्या जागेवर खड्डा वा कबर खोदली जाते. खड्डा खोदणारा इसम कोणत्याही जातिधर्माचा असू शकतो. महाराष्ट्रात बऱ्याच कब्रस्तानामध्ये खड्डे खोदणारे मुस्लीमेतर बांधव आहेत. साधारण ६ x ३ x ५ असा आकाराचा खड्डा खणला जातो. त्या मजुराची ठरलेली बिदागी त्याला देतात.

दुसरी महत्त्वाची व्यक्ती म्हणजे मयताला गुस्ल देणारा/देणारी म्हणजे विधीवत आंघोळ घालणारी व्यक्ती. या व्यक्तीला निरोप पाठवला जातो. पुढे मयत का सामान म्हणजे आंघोळ आणि दफनविधीला लागणारे सामान मागवले जाते. ज्यात ३ चटया, १६ लाकडी फळ्या (बडगे), पुरुषासाठी ११ मिटर तर स्त्रीसाठी १४ मिटर पांढरे कापड, ज्याला 'कफन' म्हणतात, ते आणतात. तसेच मसाला म्हणजे इतर सामान, ज्यात अत्तर, गुलाबपाणी, सुरमा, कापूर, साबण, रिठा, मुल्तानी माती वा चंदन पावडर इत्यादी असते. पाणी तापवायला ठेवून इतर तयारी सुरू होते. ज्यात कफनचे

तुकडे करणे, मुल्तानी माती, रिठा, गुलाब पाण्यात भिजवणे, कापूर पावडर करणे, वगैरे असते. पुरुष असेल तर कफनचे ३ भाग करतात. कुर्ता, लुंगी आणि लिफाफा. कफन कधीच शिवत नाहीत. कुर्ता, लुंगीला दोन्ही बाजूंनी कापलेल्या वा उघड्या बाजू असतात. जे अंगावर चढवले जातात. स्त्री असल्यास सिनाबंध, सरबंध, कुर्ता ३ नाडी आणि लिफाफा असतो.

मयताला आंघोळीला नेण्याआधी आंघोळ घालण्याचा स्टँड/तक्ता आणि कफनाला लोबान, उदबत्तीचा धूर देऊन सुगंधित करतात. मयताला तक्त्यावर झोपवण्याआधी आंघोळीची जागा चारीबाजूंनी पर्दे लावून बंदिस्त करतात. स्त्री असेल तर वरचा भागही बंदिस्त करतात. मयत तक्त्यावर झोपवून अंगावरचे वस्त्र काढून एखादे जाड कापड, शाल इत्यादी त्याच्या छातीपासून गुडघ्यापर्यंत घालतात. जेणे करून लज्जास्थान इतरांना दिसू नये. मयताला आंघोळ घालणाऱ्याच्या हातांचा स्पर्श मयताच्या शरीराला होऊ नये म्हणून आंघोळ घालणारी व्यक्ती हातात ग्लोज घालते वा पांढरे कापड हाताच्या पंज्याला गुंडाळते. साबण, रिठा लावून शरीर, केस स्वच्छ करतात. नंतर तोंडात कापूस फिरवून घाण स्वच्छ करतात. मलमूत्र विसर्जनाची जागा कापसाने स्वच्छ पुसून स्वच्छ पाण्याने धुतात. दोन्ही अंगावर फिरवून बसवून भरपूर पाणी वापरत शरीर स्वच्छ करतात. मयताला 'वजू' करवली जाते. शेवटी 'गुस्ल' पढून पाणी टाकतात. मुल्तानी माती, कापूर लावतात. कापूराचे पाणी गुस्लसाठी वापरतात. गुस्ल म्हणजे शारीरिक स्वच्छता स्वीकारत/करत असल्याची नियत म्हणणे.

आंघोळ घालून झाल्यावर कफनच्या जादाच्या कापडाने केस, शरीर पुसून, कोरडे करून कफन चढवले जाते. जिथे कब्रस्तान आहे त्या जागी/मस्जीदमध्ये आंघोळीचा तक्ता/स्टँड, जनाजा असतोच. तो आधीच आणवला जातो. जनाजात चटई अंथरूण कफनच्या लिफाफ्यात गुंडाळलेली बॉडी जनाजात फक्त तोंड उघडे ठेवून अंतिम दर्शनासाठी ठेवतात. मयताचे नातेवाईक, परिचित, आसपासच्या सर्वांनी दर्शन घेतल्यावर तोंड झाकून जनाजावर पिंजरा म्हणजे वरचा अर्धगोल भाग ठेवून त्यावर चादर, फुलांचा शेरा घालून कलमा पढत, खांदे बदलत जनाजा कब्रस्तानमध्ये नेतात. खांदा

फक्त पुरुष देतात आणि कब्रस्तानमध्येही फक्त पुरुषच जातात.

मयताला गुस्ल कोणीही व्यक्ती देऊ शकतो. फक्त त्या सुन्नतनुसार रीतसर आंघोळ घालता येणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे खास सराव असलेल्या जाणकार व्यक्तीला पाचारण करतात. संपूर्ण आंघोळ होईतो आणि जनाजा नेतानाही कलमा आणि दुरूद (आयत) म्हणतात. पुरुषाला पुरुष आणि स्त्रीला स्त्रीच आंघोळ घालू शकते. पुरुष मयताला डोळ्यांत सुरमा आणि अत्तर लावतात. मयताच्या आंघोळीचे पाणी, वापरलेले कपडे, राहिलेले सामान वाटेत, पायात येऊ न देता त्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावतात. आंघोळ घालणाऱ्याला इतर काही लोक मदत करतात. त्या प्रत्येकाने आधी वजू करणे गरजेचे असते. आंघोळ घालणाऱ्याला हदिया/बिदागी देतात.

जनाजा कब्रस्तान वा मस्जीदमध्ये गेल्यानंतर जनाजा समोर ठेवून जनाजाची नमाज होते. ही नमाज इतर नमाजापेक्षा वेगळी असते. नमाज झाल्यावर दिवंगत आत्म्यासाठी, त्याच्या माफीसाठी सगळे दुवा करून बॉडी दफन करायला नियोजित कब्रकडे नेतात. आधी कब्रमध्ये दोन-चार माणसे उतरतात. स्त्री असेल तर तिचे जवळचे नातेवाईक उतरतात. स्त्रीला दफन करताना ‘गैर मरहम म्हणजे इतर पुरुषांची दृष्टी पडू नये’ म्हणून कब्रच्यावर चादर पसरून धरतात. स्त्रीला शक्यतो रात्री दफन करतात. आसपास थांबलेले लोक बॉडी उचलून खाली देतात. बॉडीला किबला म्हणजे ज्या दिशेला तोंड करून नमाज पढतात, त्या दिशेला वळवून एका अंगावर ठेवतात. बडगे वा फळ्या भिंतीला टेकवून बॉडी अच्छादित करतात आणि वरून चटईने झाकतात. आत उतरलेली माणसे बाहेर येतात आणि वरून माती लोटली जाते. संपूर्ण कब्र मातीने भरून अर्धगोलाकार आकार तयार होतो. त्या गोलावर डोक्यापासून पायापर्यंत छोटासा खळग्यासारखी लांब चीरीची नाली करून त्यात पाणी घालतात. पुन्हा सगळे मिळून संपूर्ण मानवजातीसाठी कब्रस्तानमधील सर्व मृतांसाठी आणि नुकतेच दफन केलेल्या दिवंगतासाठी दुवा करतात. सर्वांना माफी मिळावी, जन्नत मिळावी कयामतच्या म्हणजे महाप्रलयाच्या दिवशी सर्वांच्या गुन्ह्याची माफी व्हावी, दयाळू अल्लाहने सर्वांना त्याच्या दयेचा आश्रय द्यावा, अशी विनवणी करतात.

तत्पूर्वी पाणी घातल्यावर कब्रवर शेरा, फुले घालून काहीजण उदबत्ती लावतात.

दफनविधी पूर्ण झाल्यावर सगळे परत घरी येतात. मयतीला आलेल्या सर्वांना चहा-पाव देतात. शक्यतो तीन दिवस चूल पेटवत नाहीत. शेजारी, नातेवाईक 'बुट्टी' म्हणजे जेवण बांधून आणून देतात. ते शाकाहारी असते. सगळे आल्यावर ज्या ठिकाणी आंघोळ घातली, त्या ठिकाणी काही लोक लोबान जाळतात, काही ठिकाणी उदबत्ती लावतात. तर काही जण काहीच करत नाहीत. विवाहित पुरुषाचे निधन झाले असल्यास त्याचा जनाजा उचलण्याआधी पत्नीला महेर म्हणजे निकाहवेळी ठरलेली रक्कम दिलेली नसल्यास ती तिने माफ केल्याची कबुली घेतात. मृत व्यक्तीवर कर्ज असेल तर कर्ज फेडण्याची जबाबदारी कोणीतरी घेत असल्याची सगळ्यांसमोर कबुली घेऊनच जनाजा उचलतात. जनाजा गेल्यावर पत्नीच्या बांगड्या फोडणे, लच्छा म्हणजे मंगळसूत्र, जोडवी उतरवली जातात. तीन महिने दहा दिवस त्या विधवा बाईला 'इदत'मध्ये राहावे लागते. म्हणजे बाहेर जाणे वा दुसरा निकाह करणे निषिद्ध असते. प्राण गेल्यापासून ते दफनविधी होईपर्यंत बऱ्याच कुटुंबांत मृताच्या कल्याणासाठी, माफीसाठी आणि जन्नतमध्ये प्रवेश मिळावा यासाठी कुराणवाचन, आयातींचे वाचन, नामस्मरण करतात. काही लोक तिसरा दिवस, चेलम म्हणजे चाळीसवा, नववा दिवस, वर्षश्राद्ध दिवशीही वाचन, स्मरण करतात आणि गरजू, गोरगरिबाला अन्नदान, कपडेदान, पैसेदान देतात.

'ज्यारत' म्हणजे तिसरा दिवस. या दिवशी घरातले सगळे पहाटेच शूचिर्भूत होतात. घरातली लहानमोठी पुरुषमंडळी अत्तर, उदबत्ती, फुले, शेरा घेऊन कब्रस्तानात जातात. कब्रजवळचा पालापाचोळा स्वच्छ करून कब्र सारखी करतात. पांढरा चुना लावतात. अत्तर, फुले, शेरा, उदबत्ती लावून फातिहा पढतात आणि कब्रस्तानातल्या सर्व मृतांसाठी दिवंगतांसाठी दुवा करतात. घरात सुन्नी जमातीचे लोक मुरमुरे, फुटाण्याचा फातिहा देतात आणि ते भेटायला येणाऱ्या घरातील व नात्यातील लोकांना वाटतात. हल्ली या प्रथापालन कमी कमी होत चालल्या आहेत किंवा घरातल्या घरात

छोट्या प्रमाणात होतात. तीन दिवसांनंतर चूल पेटवून रोजच्या स्वयंपाकाला सुरुवात होते. ही पद्धतही हल्ली लोक फारशी पाळत नाहीत.

**अजन्मा जीवाचा दफनविधी –** जर बाळ आईच्या पोटातच निधन पावले असेल म्हणजे मृत बाळ जन्मले तर त्याच्या दफनविधीसाठी गुस्ल, जनाजा, नमाज, कफनची गरज नाही. छोटीसी कब्र खणून त्याला दफन करतात; पण बाळाने जन्म घेतल्यावर श्वास घेतला असेल, दूध प्याला असेल तर मात्र त्याला कफन दफनचे सगळे विधी करतात.

■ □ ■

# प्रचलित शब्द आणि खरे अर्थ

**फिक** – म्हणजे इस्लामिक न्यायशास्त्र.

**हराम आणि हलाल** – ज्या गोष्टी इस्लामधर्मानुसार मान्यता प्राप्त अर्थात वाजीब असतात त्या हलाल. ज्या निषिद्ध मानल्या जातात त्या हराम समजतात.

**मक्रुह** – म्हणजे वर्जित असणे, मान्य नसणे.

**खलिफा** – म्हणजे असा शासक, जो इस्लामी कायद्यानुसार राजकीय व्यवस्था चालवतो किंवा राज्य करतो. सलाफा, सलाफी किंवा सहाबा म्हणजे पैगंबरांचे सहकारी होय.

**जिहाद** – हा अरबी शब्द आहे जो जहृद या शब्दापासून तयार होतो. जिहाद म्हणजे संघर्ष करणे.

जिहादचे दोन प्रकार आहेत. जिहादे असगर आणि जिहादे अकबर. जिहादे असगर म्हणजे स्वत:त दडलेल्या अपप्रवृत्तींविरुद्ध, अयोग्य वर्तनाविरुद्ध संघर्ष करून त्या बाबींचा त्याग करणे. जसे व्यसन, खोटेपणा, चोरी, अप्रामाणिकपणा, एखाद्याचे शोषण, आळस, कामचुकारपणा, स्वार्थ, अतिहव्यास, अतिराग इत्यादी.

जिहादे अकबर म्हणजे समाजाच्या, मानवजातीच्या कल्याणासाठी शक्तीने, वाणीने, लेखणीने केलेले प्रयत्न-संघर्ष होय.

**लवजिहाद** – नावाचा कुठलाच जिहाद अस्तित्वात नाही. केवळ इस्लामिक शब्द वापरायच्या, बदनामीच्या हव्यासापोटी इंग्लीश, अरबी शब्द जोडून उठवलेली अफवा आहे.

जिहादचा दहशतवादाशी दुरान्वे संबंध नाही. दहशत म्हणजे भीती बसवणे. भीती आणि जिहाद म्हणजेच संघर्ष या दोन वेगळ्या संकल्पना आहेत. इथेही एका विशिष्ट समूहाला लक्ष करण्यासाठी वा द्वेष पसरवण्यासाठी या शब्दाचा कट्टरतावाद्यांकडून उपयोग होतो. जिहाद या शब्दाचा खरा अर्थ हिंदूंप्रमाणेच मुसलमानांनीही समजून घ्यायला हवा.

**फतवा** – म्हणजे धार्मिक आदेश. दैनंदिन जीवन जगताना व्यक्तीला वा समाजाला आलेल्या समस्येवर तोडगा ठरणारा आदेश धार्मिक विद्वानांकडून काढला जातो त्याला 'फतवा' म्हणतात. फतवा काढताना कुराण, हादिस आणि इस्लामिक इतिहासातील उदाहरणांचा आधार घेतला जातो. फतवा सर्व मुस्लीम समाजाने मानलाच पाहिजे असे बंधन नाही. बरेलवी, देवबंदी, वहाबी वगैरे धर्मपिठांतील, तर कधी स्थानिक धार्मिक शिक्षण संस्थेतले धार्मिक विद्वान फतवा काढतात.

**काफीर म्हणजे काय ?**

कुफ्र करणारा काफीर होतो. कुफ्र करणारा म्हणजे 'लपविणारा' होय. जो काही लपवितो, जो कोणी सत्य लपवतो वा सत्य, वास्तव नाकारतो तो काफीर होतो. उदा. एखाद्याचे स्वातंत्र्य, न्याय्य हक्क, सत्य नाकरणे. जे मुस्लीम नाहीत ते काफीर असतात असे समजणे केवळ अज्ञान आणि अज्ञानच आहे.

उलट कुराणानुसार आदेश आहेत की, इतरांच्या धर्माचाही आदर केला पाहिजे. धर्माबाबत अट्टहास वा सक्ती करू नये. 'लकुम दीन कुम वलिये दिन' म्हणजे 'मी माझा धर्म पाळतो, तू तुझा धर्म पाळ' असे स्पष्ट आदेश आहेत.

**कलमा पढणे** – म्हणजे अरबीतला एक श्लोक म्हणणे. म्हणजे जगाचा पालनहार केवळ एक अल्लाह आहे आणि मोहंमद पैगंबर हे अल्लाहने पाठवलेले प्रेषित आहेत, हे मान्य करणे.

**फातेहा पढने** – म्हणजे कुराणातील श्लोक आयत/सुरह म्हणणे आणि अल्लाह एक आहे. सर्व सृष्टी त्याची रचना आहे आणि सर्व सजीव निर्जिवांच्या कल्याणासाठी दुवा करणे.

**अस्लामवालैकुम - वालैकुम सलाम**- हा दोन व्यक्ती समोरासमोर आल्यावर अभिवादन करण्यासाठीचा शब्द आहे. म्हणजे तुमच्यावर अल्लाह कडून सलामतीची कृपा असो. उत्तरादाखल तुमच्यावरही अल्लाहची सलामतीची कृपा असो असे म्हणतात.

**अल्लाहाफिज/खुदाहाफिज** - तुमची हिफाजत (रक्षा) अल्लाह/खुदा करेल.

**अल्लाहू अकबर** - म्हणजे अल्लाह महान आहे.

**उलेमा** - म्हणजे धर्मपंडित.

**नारा-ए-तकबीर** - म्हणजे अल्लाहची स्तुती आहे.

**दिन वा महजब** - म्हणजे धर्म.

## खत्ना करणे

खत्ना करणे किंवा सुल्ता करणे ही एक धार्मिक प्रथा समजली जाते. जन्माला आलेल्या प्रत्येक मुस्लीम पुरुषाची खत्ना करणे अनिवार्य आहे. यात पुरुषाच्या लिंगाची टोकाची कातडी कापून उर्वरीत कातडी मागे सरकवली जाते. याचा स्वच्छतेशी संबंध आहे. संसर्गाच्या व मूत्रनलिकेच्या आजारांपासून संरक्षण होऊ शकते.

मूल जन्मल्याच्या तीन दिवसांनंतर ते नकळत्या वयापर्यंत कधीही खत्ना होते. शक्यतो लवकर करावी. कारण जखम लवकर भरून येते असा समज आहे. मुसलमानांत मुलींचा सुल्ता होत नाही. बोहरा मुस्लीम समाजात ही प्रथा आहे.

**मकतब वा अंजूमन** - छोट्या बालकांना प्राथमिक धार्मिक शिक्षण जे जवळपासच्या मस्जीदमध्ये देण्याची व्यवस्था असते, मुले आणि मुलीही मकतबला जाऊन दिनचे शिक्षण घेतात. आठ-दहा वर्षांनंतर मुली शक्यतो घरी शिक्षण पूर्ण करतात. तिथे अरबीच्या प्राथमिक पुस्तकांची ओळख, नमाज, कलमे, वजू, नियत शिकवली जाते.

**हदिया** - म्हणजे कुराण वाचन शिकवून एक-दोन वेळा पुनर्वाचन, करून घेणाऱ्या गुरूप्रती आदर व्यक्त करण्याची रस्म असते. ज्यात त्या शिकवणाऱ्या व्यक्तीला पोषाख, मानधन देऊन दावतही केली जाते. यात

कुटुंबीयही शामिल होतात. 'हदिया'चा एक अर्थ मानधन असाही होतो.

**हकिका** – हीपण एक मुसलमानी सांस्कृतिक परंपरा आहे. याला 'हक्क अदा करणे' असेही म्हणता येईल. मुलगा-मुलगी जन्माला येऊन मातापिता होण्याचा सन्मान प्राप्त झाला, याची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दावत करून गोरगरीब, आप्त-कुटुंबीय, शेजाऱ्यांना जेवू घातले जाते. बकरे कापतात. त्यावेळी ज्या मुलाच्या किंवा मुलीच्या नावे हकिका करतात, तिचे-त्याचे हात त्या जनावराला लावून दुवा करत बकरे कापतात. यावेळी नवीन कपडे, फुलपानची रस्म करतात. कुटुंबीय, नातेवाईक सामिल होतात.

**बालिग होना** – मुलगी वयात येणे म्हणजे तिची मासिकपाळी सुरू होणे. प्रथमवेळी तिला ५/७ दिवस काही काम करू देत नाहीत. आराम करू देतात. ऐपतीनुसार चांगले खाऊ-पिऊ घालतात. ७ व्या दिवशी नवीन कपडे, बांगड्या करून फुलपानाची रस्म करतात. ही पद्धत दुर्मीळ होत आहे.

**दूध बक्षना** – ही आईच्या दूधाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची प्रथा होय. या दिवशी सगळी भावंडे एकत्र येऊन अथवा सोईनुसार एकेक जण आईला नवीन कपडे, भेटवस्तू देऊन तिला तिच्या दूधाच्या ऋणातून मुक्त करण्याची विनंती करतात. मौलाना किंवा आलिम व्यक्ती मध्ये बसून आईचा हात त्या मुलाच्या/मुलीच्या डोक्यावर ठेवून अल्लाहला साक्ष मानून दूधाच्या ऋणातून मुक्त केले, अशी नियत कबुली म्हणून घेतो. ही रस्म कुटुंबासमोर, नातेवाईकांसमोर करतात. नंतर सगळे एकत्र जेवतात आणि अल्लाहप्रती कृतज्ञता व्यक्त करतात.

जर अपत्याआधी आईचे निधन झाले, तर दफनाच्या आधी 'आई मला तुझ्या दूधाच्या ऋणातून मुक्त कर' अशी सर्वांदेखत विनंती करून मगच दफनविधी होतो आणि आईच्या आधी अपत्याचे निधन झाले, तर 'अल्लाहच्या साक्षीने मी तुला माझ्या दूधाच्या ऋणातून मुक्त केले' असे आईने म्हणल्यावरच दफनविधी होतो.

## वक्फ म्हणजे काय ?

इस्लामधर्माच्या कोणत्याही व्यक्तीने आपली चल किंवा अचल

संपत्ती समाजकल्याणासाठी दान करणे, समर्पित करणे याला 'वक्फ' समजतात. यात जमीन, धर्मशाळा, कब्रस्तान, खानकांह, घर, मस्जीद, शाळा, विद्यालय, अन्नछत्र अशा कोणत्याही कामासाठी वक्फ बोर्ड निर्माण होऊ शकते. वक्फ बोर्डाचे सदस्य संकलित संपत्तीची देखरेख, लोककल्याणार्थ वापर, हिशोब, धार्मिक कार्य, धर्मदाय हेतू आणि इतर उद्देश पूर्ण करण्यासाठी कार्य करतात. त्याला वेगळे कायदे, तरतुदी आहेत. उत्सुकता असणाऱ्यांनी अधिक माहितीसाठी 'भारतीय मुस्लीम कायदे' लेखक प्रदीप व्ही. तपसेपाटील (हायकोर्ट वकील) हे पुस्तक पाहावे.

■ □ ■

# समज आणि गैरसमज

## चार लग्ने आणि चाळीस मुले

मुसलमानांबाबत असणाऱ्या या समजाबाबत नीट समजून घेतले पाहिजे. बरेच गैरसमज हे ती संकल्पना, व्याख्या आणि मथितार्थ नीट न समजून घेतल्यामुळे होतो. इस्लामी आदेशानुसार कुराण अवतरणाच्या काळात पुरुषाला चार लग्नांची अनुमती दिलेली होती. त्या काळात एक युद्ध ज्याला 'ओहद'चे युद्ध म्हणतात, ते युद्ध झाले होते. तेव्हा मोठ्या प्रमाणात पुरुष मारले गेल्याने त्यांच्या विधवा पत्नी, अनाथ मुले-बाळे यांच्या असाहाय्यतेचा, कमजोरीचा कोणी गैरफायदा घेऊ नये, त्यांना आधार मिळावा, पालनपोषण जायज पद्धतीने व्हावे म्हणून दुसरे, तिसरे किंवा चौथे लग्न करण्याची अनुमती मिळाली. चेतावणी अशी दिली गेली की, जर तुम्ही सर्व पत्नींना समानतेने वागणूक देणार असाल, प्रत्येकीशी समान न्यायाने वागणार असाल तरच एकापेक्षा अधिक लग्नांचा विचार करा. अन्यथा एकीशीच नीट निबाह करा.

बहुपत्नीत्वाविषयी खूप चर्चा, विवाद आहेत. बहुपत्नीत्व प्रथा फक्त मुसलमानांत आहे, अन्य धर्मियांत नाही किंवा मुसलमानांत दोनपेक्षा जास्त मुले जन्माला घालतात, इतर धर्मियांत नाही, या गृहितकाच्या चिरफळ्या उडवणारी अनेक उदाहरणे अगदी प्राचीन युगापासून आजपर्यंत

पाहायला, ऐकायला, वाचायला मिळतात. फक्त दृष्टिकोन खोडसाळ वा बदनामीचा नसावा. आपल्या आसपास, शेजारी, मित्रपरिचितातील किती मुसलमानांच्या चार बायका, चाळीस मुले आहेत; याचा प्रामाणिकपणे शोध घ्यावा. चार राहू दे, पण एकापेक्षा जास्त बायका कितीजणांना आहे याचा शोध घ्यावा. मुसलमान आधीच अल्पसंख्याक आहेत. पूर्वी चार-सहा अपत्ये असणे सामान्य होते; पण अलीकडे १९९०च्या नंतर मुसलमानांत शिक्षणाबाबत जागृती थोड्याफार प्रमाणात आली. बाकी महागाईचा कहर यामुळे बहुतांशी मुसलमान स्त्रियांनी कुटुंबाच्या सहमतीने संतती नियमन शस्त्रक्रिया राजीखुशीने करून घेतलेली आहे. सत्यता पडताळून पाहण्यासाठी कोणत्याही सरकारी वा इतर हॉस्पिटलमधील रेकॉर्ड पाहावेत.

**मुस्लीम द्वीभार्या पद्धती**

अनेक अपत्ये, लोकसंख्या इत्यादींबाबत पुराव्यासह इत्यंभूत माहिती देणारी अनेक पुस्तके आहे. एस. वाय. कुरेशी (आयएएस) यांचे 'पॉप्युलेशन मिथ' हे पुस्तक वाचकांनी जरूर वाचावे म्हणजे 'मुसलमान, त्यांच्या चार बायका आणि चाळीस अपत्ये' हा गैरसमज दूर होईल. भारताची एकंदरीत वाढती लोकसंख्या सरकारी नियोजनपूर्वक थोपवणे सगळ्यांच्याच हिताचे होईल.

**भोंग्यातून अजान**

आसपासच्या मुसलमानांना नमाजाला बोलावण्यासाठी मस्जीदचा बांगी अजान देतो. नमाजाच्या वेळा जवळपास ठरलेल्या असतात आणि प्रत्येक मुसलमानाला त्या वेळा माहीत असतात. भोंग्यातून अजान हा ना धार्मिक प्रथेचा, अस्मितेचा मुद्दा नाही. हा राजकीय ध्रुवीकरणाचा डाव आहे. न्यायालयाने ठरवून दिलेल्या आदेशानुसार आवाजाची तीव्रता राखणे हे ध्वनी-प्रदूषणाच्या दृष्टीने आणि इतरांना त्रास होऊ नये म्हणून महत्त्वाचा मुद्दा आहे. मुसलमानांप्रमाणेच हा आदेश शांतता, समता प्रिय सर्वच लोकांनी पाळावा. आरत्या, काकड आरत्या, मिरवणुका, गणपती, नवरात्र, लग्नाची वरात, फटाके फोडणे, दहीहंडी उत्सव, रस्त्यावर वाहनांचे कर्कश्श हॉर्न वाजवणे याच्या ध्वनी-प्रदूषणाबाबतही नियम व्हावे आणि ते सर्व धर्मियांनी,

सर्व नागरिकांनी पाळावे याबाबत सर्वांचे एकमत असेल.

## थुंकणे की फुंकणे

मुसलमान स्वयंपाक केलेल्या भांड्यात, खाद्यपदार्थात थुंकतात, ही अफवा व्हिडिओ एडिट करून, कट करून, जास्तीचे जोडून समाज माध्यमात फेक न्यूज पसरवणे हे एक मुसलमानांना बदनाम करण्याचे, मुसलमानांविषयी द्वेष पसरवण्याचे षडयंत्र आहे. फॅक्ट फाईंडिंग करणाऱ्या अनेक संस्था, चॅनेल्स, व्यक्ती, संघटनांनी खरे वास्तव पुराव्यासह शोधून सोशल मिडीयावर  टाकलेले आहे; पण जितक्या प्रमाणात खोटे, फेक व्हिडिओ, बातम्या व्हायरल झाल्या आणि पाहिल्या गेल्या, तितक्या प्रमाणात सत्यता सांगणाऱ्या पोस्ट, व्हिडिओ सोशल मिडीयावर पसरले नाही जर पसरू दिले असते तर बऱ्यापैकी लोकांचा गैरसमज दूर झाला असता.

मुसलमानांत प्रत्येक कार्य, कृती करताना नियत करणे, अल्लाहची कृपा आणि बरकत असावी, कार्य व्यवस्थित पूर्ण व्हावे म्हणून दुवा करणे आणि दम करणे याला खूप महत्त्व आहे. दम करणे म्हणजेच कुराणातील आयती, सुरह म्हणून दुवा करून फुंकणे वा फुंकर मारणे. म्हणजेच फुंक मारतात, थुंकत नाहीत याला 'दम करना' म्हणतात.

## सुदखोरी हराम है

इस्लामच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार व्याज घेणे हराम म्हणजे निषिद्ध मानलेले आहे.

## दहशतवाद-दहशतवादी

'प्रत्येक मुसलमान दहशतवादी नसतो, मग प्रत्येक दहशतवादी मुसलमान का असतो ?' मुसलमानाविषयी पराकोटीचा द्वेष पसरवणारी ही पोस्ट अध्येमध्ये सामाजिक माध्यमांवर जाणीवपूर्वक पसरवली जाते. उद्देश... कसातरी मुसलमानांना दहशतवादाशी जोडून असुरी आनंद मिळवायचा किंवा मुसलमानांविषयी समाजात द्वेष-भीती भरवायची. गुन्हेगारीवृत्तीला कोणताही धर्म, जात नसते. ती केवळ  एक विकृत मानसिकता आहे. ती कोणत्याही जातीधर्माच्या व्यक्तीत असू शकते. बॉम्बस्फोट घडवणारे, बॉम्ब

बनवताना स्फोट होऊन पकडल्या गेलेल्या संघटना आणि व्यक्तींच्या नावाचा शोध त्रयस्थपणे, पूर्वग्रह न ठेवता घ्यायला हवा. 'हु किल्ड करकरे', 'आरएसएस एक नंबरची दहशदवादी संघटना', 'बॉम्बस्फोट', 'ब्रह्मण्यवादी', 'मुसलमानांना फाशी' ही आणि याबाबत सविस्तर खुलासा करणारी अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. वाचकांनी ती वाचून विचार करावा. अशा प्रकरणात संशयाच्या अधारावर अनेक मुस्लीम तरुणांची धरपकड करून, केवळ संशयावरून ताब्यात घेऊन अनेक वर्षे तुरुंगात खितपत ठेवलेले आणि नंतर निर्दोष सुटलेले अनेक मुसलमान तरुण आहेत. जे कोणी अशा कृत्यात खरेच सामील असतील, मग ते मुस्लीम असो वा हिंदू, त्यांच्यावर रितसर कारवाई होऊन कठोर शिक्षा देण्यात यावी, याबाबत सर्व भारतीयांचे एकमत असेल यात शंकाच नाही.

## मुसलमानांनी भारताला लुटले वा मंदिरे तोडली

मुळात ही वल्गनाच असत्य आहे. भारतावर साधारणपणे ११९३ ते १५५४ पर्यंत घोरी, खिलजी, तुगलक, सईद वंशी, लोधी, मुगल, सुरीयन वंशाच्या राजांची सत्ता होती. यांपैकी इथे जन्मलेले आणि पुढे वारसाहक्काने राजा झालेले सत्ताधिश वगळता सगळे भारताबाहेरून भारतावर राज्य करण्याच्या इराद्याने आलेले होते. सत्ता आणि सत्ताविस्तार करण्याच्या मनसुब्याला प्रत्यक्षात उतरवण्यासाठी त्यांनी अनेक भलेबुरे निर्णय घेतले. त्यांचा सत्ताप्रवेश सुकर व्हावा, सत्ताविस्तार चौफेर व्हावा म्हणून त्यांना मदत करणारे आणि त्यांनी घेतलेल्या भल्याबुऱ्या निर्णयाची निर्दयीपणे अंमलबजावणी करणारे, त्यांच्या पदरी असणारे, जसे मुस्लीम होते तसे हिंदूही होते. बादशहाची मर्जी संपादन करणे आणि लाभाचा मालिदा लाटणे यात दोन्ही समाजाचे अधिकारी अग्रेसर होते. अनेक इनामे, जहागिरी, वतने मिळवली. आपल्या मुली-बहिणींची लग्ने लावून सोयरीक केली. हा सर्व राजकारणाचा भाग होता. तसेच अनेक इमारती, किल्ले, बागा इ. बांधून विकासही केला.

त्या आधी वा नंतरच्या सत्ताधाऱ्यांनीही हेच केले. मग आजचा मुसलमान याला दोषी कसा ? भारतीय मुसलमान धर्मांतरीत आहे. तो

इथलाच शोषीत, वंचित, अत्याचारीत, दलित, गरीब, मागासवर्ग आहे. ते औरंगजेबाचे वंशज कसे होतात ? सगळ्याच राजांनी त्या काळी मंदिरे, मशिदी तोडल्या. त्याचा बदला फक्त आजच्या मुसलमानाशी घेणे हा कुठला न्याय ? ही कोणती नैतिकता ? विवेकी वाचकांनी, भारतीयांनी याचा कोणताही पूर्वग्रह न ठेवता सुज्ञपणे विचार करावा.

## मुसलमानांची भाषा

वास्तविक भारतीय मुसलमानांची स्वत:ची अशी कोणतीच भाषा नाही. इस्लामचा उदय अरब देशात झाल्याने तिथले रहिवासी अरबी बोलतात. इतर मुस्लीम देशातील लोक त्या त्या देशाची मातृभाषा बोलतात. भारतातही कर्नाटकात कन्नड, केरळमध्ये मल्याळम, आंद्रात तेलुगु, काश्मिरमध्ये कश्मिरी, कोकणात कोकणी म्हणजे त्या त्या भागातली भाषा बोलतात. एरवी अनेक भाषेतील शब्द, व्याकरणाच्या मिश्रणाने तयार झालेली 'दखनी' भाषा वापरतात. महाराष्ट्रातल्या अनेक जिल्ह्यांतील मुसलमान आपसात सहज स्थानिक ग्रामीण मराठी बोलतात.

## मुसलमानांना मराठी येत नाही

हा आणखी एक पसरवलेला गैरसमज आहे. वर सांगितल्याप्रमाणे अनेक ग्रामीण कुटुंबांत मराठी बोलली जाते. म्हणजे शहरी भागात ज्यांचे शिक्षण ऊर्दू माध्यमातून झाले आणि शिक्षण अर्धवट सोडले, अशांना मराठी येत नसण्याची शक्यता असावी. जसे सर्व मराठी भाषिकांना व्यवस्थित हिंदी येत नाही तसे सर्वच मुसलमानांना व्यवस्थित मराठी यायला हवी, हा अट्टहास आहे. महाराष्ट्रात अनेक मराठी बोलणारे लेखक, कवी, पत्रकार, प्राध्यापक, संशोधक आणि सामान्य मुसलमान आहेत.

## मुसलमान हिंदूंपासून अलिप्त राहतात

हिंदू-मुस्लीम मैत्री, शेजारधर्म, गली-मोहल्ल्याच्या आठवणींवर आधारलेले अनेक सिनेमे, कादंबरी, पुस्तके आहेत. शिवाय प्रत्येक माणसाच्या हिंदू-मुस्लीम शेजारधर्म, मैत्री, गावगल्लीच्या आठवणी हमखास आहेत. गावगाड्यात मुस्लीम कासार, मुलाणी, मुजावर इत्यादी बलुतेदार-

अलुतेदारांचा सहभाग याची साक्ष देतो. अलीकडच्या काही वर्षांपासून ही एकी संपवण्याचे नियोजनपूर्वक प्रयत्न सुरू आहेत. त्याचसाठी द्वेष पसरवणे, भीती पसरवणे आणि मुसलमानांचे राक्षसीकरण करणे, इतिहासातील मुद्दे उकरून काढणे हे त्याचाच भाग आहेत. दोन्ही समाजसदस्यांनी परस्पर संवाद साधून ही दुरी संपवण्याचा प्रयत्न करायला हवा.

## मुसलमान तरुण हिंदू मुलींना नादी लावून फसवतात

या अफवेचा एक व्यापक परीघ आहे. हिंदू आणि मुस्लीम विवाहाची भारतात एक मोठी परंपरा आहे. पूर्वी राजकीय तडजोडीसाठी असे विवाह होत. काही प्रेमप्रकरणांनंतर विवाहाचा निर्णय घेत. हिंदू-मुस्लीम विवाहाची असंख्य उदाहरणे समाजात आहेत. कदाचित विवाह ही ज्याचीत्याची अत्यंत खाजगी बाब असल्याने किंवा बदनामीच्या कल्पनेने अनेकजण त्याचा गवगवा करत नसतील. विवाहानंतर न पटल्याने वेगळे होणारे, घटस्फोट घेणारे अगदी ॲरेंज मॅरेज केलेले, पत्रिका पाहून लग्न केलेले, फालखोलून (मुस्लीम पंचांग) पाहून लग्न केलेलेही असतात. हिंदू-मुस्लीम विवाहात न पटल्याने घटस्फोट झाला तर यात धर्माला दोषी ठरवून मोकळे होतात. खरेच फसवल्याचे प्रकरण दोन्ही समाजात आढळल्यास पोलीस कारवाईचे मार्ग उपलब्ध आहेत. त्यामुळे धर्माभिमान्यांनी मुस्लीम तरुण हिंदू मुलींना फसवतात किंवा हिंदू तरुण मुस्लीम मुलींना फसवतात हे म्हणणे आत्मसाक्ष ठेवून तपासून पाहावेत. शिवाय सज्ञान तरुण-तरुणींना स्वखुशीने जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य आपल्या संविधानाने दिलेले आहे.

■ □ ■



**तमन्ना अस्लम इनामदार**

जन्म, शिक्षण - पुणे

वयाच्या १८व्या वर्षापासून सामाजिक क्षेत्रात चळवळीतली कार्यकर्ती म्हणून सक्रीय सहभाग.

पर्सनल रिलेशनशीप, स्कूल कौन्सलर आणि लाईफस्कील ट्रेनर म्हणून १५ वर्षांपासून कार्यरत.

महिला, राष्ट्रीय एकात्मता विषयावर महाराष्ट्रातून निमंत्रित व्याख्याती. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बहि:शाल व्याख्याती.

मुस्लीम sc, st, nt, vjnt आणि obc जातीजमातींवर संशोधन आणि प्रत्यक्ष भाठीभेटीसाठी महाराष्ट्र दौरा करून संकलित माहितीचा समावेश असलेले 'मुस्लीम बलुतेदार - भाग १, २, ३' या पुस्तकांचे लेखन.

इतर पुस्तके - एक नजर तलाकनंतर, मुस्लीम महिलांच्या समस्या - शोध आणि बोध, बाईच्या जातीनं, बेनकाब, प्रहार, युवामोहोर, रिवायत : हिंदू-मुस्लीम संस्कृती, आंतरधर्मीय विवाहित जोडप्यांच्या अनुभवांवर आधारित - अभेद्य ते भेदताना.

सदस्य सहभाग - अनेक मान्यवर संस्था, संघटनांच्या कार्यकारिणीत सहभागी, सक्रीय कार्यकर्ती.

अनेक पुरस्कार, सत्कारांसाठी निवड.



दादा पुरव रिसर्च
ॲण्ड ट्रेनिंग इंस्टिट्यूट
: तर्फे प्रकाशित